|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ | अंक : ४९ | सोमवार दि. २७ नोव्हेंबर २०२३ ते रविवार दि. ०३ डिसेंबर २०२३ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## कौटुंबिक भांडण जीवघेणे ठरले आईने मुलांना धरणात बुडवून मारले

हिंगोली/क्राईम रिपोर्टर



संसारात कुठल्या ना कुठल्या कारणावरून पती-पत्नीमध्ये भांडणे होत असतात. पण हि भांडणे सामोपचाराने मिटवायची असतात. कारण ती मिटवली नाहीत तर त्यातून कोणताही भयंकर प्रकार घडू शकतो. कळमनुरी तालुक्यातील मोरगव्हाण गावात आपटी-पत्नीच्या भांडणातून एक भयंकर घटना घडली. पतीवरील रागामुळे पत्नीने ...पान २ वर

## प्रेमाला नकार देणे हवाई सुंदरीला महागात पडले माथेफिरू प्रेमविराने तिच्यासह चौघांचे मुडदे पाडले



आरोपी प्रवीण चौगुले



उडुपी (कर्नाटक)/क्राईम रिपोर्टर

आजकालच्या तरुणांना काय झाले आहे कुणास ठाऊक? त्यांना जे आवडते ते त्यांना कसेही करून हवे असते. ते मिळवण्यासाठी त्यांची कोणत्याही थराला जाण्याची तयारी असते. एकतर्फी प्रेमाच्या बाबतीतही असेच आहे. एखाद्या तरुणाला एखादी तरुणी आवडली कि तिला आपले करून घेण्यासाठी काहीही करण्याची त्यांची तयारी असते. त्यामुळे एकतर्फी प्रेम करणारा प्रेमवीर जेंव्हा त्या तरुणीच्या मागे लागतो, तेंव्हा तिच्याकडून त्याला प्रतिसादाची अपेक्षा असते. तिच्याकडून उत्तर येईपर्यंत त्याचे तिच्यावर एकतर्फी का होईना प्रेम असते. पण जेंव्हा ती नकार देते तेंव्हा त्याच्या मनात तिच्या विषयी सुडाची भावना निर्माण होते. ती जर आपली झाली नाही तर इतर कोणाचीही होता नये, अशी त्याची मानसिकता बनते आणि याच दुराग्रही मानसिकतेतून त्याच्या मनात तिचे किंवा तिच्या कुटुंबाचे वाईट करण्याचे विचार येतात. याच सुडाच्या विचारातून महाराष्ट्रात आजवर अनेक मुलीना प्राण गमवावे लागले आहेत. त्यांचा इतकाच दोष होता कि तिच्यावर एकतर्फी प्रेम करणाऱ्याला तिने नकार दिला होता. तिचा हाच नकार तिच्या आयुष्याची मृत्यूघंटा बनतो. उडपी शहरातील नेहूर येथे रहाणाऱ्या अफनान या हवाई सुंदरीवर विमान कंपनीत राहणाऱ्या प्रवीण चौगुले याचे एकतर्फी प्रेम होते. मात्र अफनानचे अफनानचे तिच्या करियरकडे लक्ष होते. त्यामुळे तिने नकार दिला. तिच्या नकारामुळे प्रवीण इतका चिडला कि रागाच्या भरात त्याने तिच्या घरात घुसून अफनान, तिची बहिण अजनान, भाऊ असीम व आई हसीना अशी चौघांची चाकूने भोसकून हत्या केली, तर अफनान हिची वृद्ध आजी हिच्यावरही वार केले, पण ती केवळ जखमी झाली. या प्रकरणी पोलिसांनी प्रवीण चौगुले याला अटक केली आहे.

उडुपी शहरातील नेऊर येथील तृप्तीनगर येथे एक मुस्लीम समाजातील कुटूंब राहयला आहे.या घराचा कर्ता पुरूष हा गेल्या काही वर्षापासून दुबई येथे नोकरीला असल्याने तो दोन तीन वर्षातून एकदाच उडुप्पीला येत असतो.त्याची पत्नी हसीना, वयोवृध्द आई हजिरा, मुले अफनान आयनाज आणि असीम असे पाचजण या घरात राहयला आहेत. मुलगी अफनान देखील मंगळूर येथील विमान सेवेत नोकरीला असल्याने कुटूंबात सगळे काही आलबेल होते. आई हसीना आणि वयोवृध्द सासू हजिरा या दोघी घर सांभाळत होत्या. मंगळूर येथील विमान सेवेत काम करीत असताना अफनान हिची ओळख ही प्रविण चौगुले याच्याबरोबर झाली. प्रविण हा मुळचा महाराष्ट्रातील सांगली येथील रहिवाशी असून तो सांगली येथे पूर्वी सीआरपीएफमध्ये नोकरी करीत होता. येथे नोकरी करीत असताना त्याने परिक्षा देवून मंगळूर येथील विमान कंपनीत क्रुर मेंबर म्हणून काम करू लागला. या दरम्यान त्याची ओळख ही अफनानबरोबर झाली असल्याने त्या दोघात मनमोकळेपणाने बोलणे होत होते. प्रविण ही दिसायला देखणा तो एखाद्या हिरोसारखा दिसत होता. त्याला ही विमान कंपनीत चांगला पगार होता. तो सांगलीचा असल्याने नोकरीच्या निमित्याने तो मंगळूर येथेच ...पान २ वर

## 'लिव्ह इन'मधले त्यांचे नाते अल्पजीवी ठरले चारित्र्याच्या संशयावरून प्रेयसीला ठार मारले





मुंबई/एस.कुमार

'लिव्ह इन' रिलेशनशिप हे एक असे नाते आहे की ज्याला कोणत्याही प्रकारची सामाजिक मान्यता नाही किंवा कायदेशीर मान्यता ही नाही, तरीही काही लोक केवळ मजा मौज करण्यासाठी लिव्ह रिलेशनशिपमध्ये राहतात. पण अशा नात्यांमध्ये कोणत्याही प्रकारची विश्वास अहर्ता नसते. त्यामुळे अशी नाती कधीही तुटतात. धारावीत राहणारी प्रतिभा अक्सर नावाच्या तरुणासोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. परंतु तिच्या चारित्र्यावर अक्सर याचा संशय होता आणि याच संशयातून त्याने तिची गळा दाबून हत्या केली आणि तिचा मृतदेह एका बॅगेत भरून फेकून दिला. मात्र त्याच्या या पापाला अखेर वाचा फुटली आणि पोलिसांनी अक्सरला अटक केली.

दि. १९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११.३० च्या दरम्यान बीट मार्शल कुर्ला पोलिस ठाणे गस्त घालीत असताना, त्यांना माहिती मिळाली कि, सी.एस.टी. रोड शांतीनगरच्या समोरच्या बाजूला मेट्रो रेल्वेचं काम सुरु आहे. त्याठिकाणी एक संशयित बॅग पडलेली आहे. बिट मार्शलने सदर ठिकाणी धाव घेतली असता त्यांना धक्का बसला. त्याने ही घटना कुर्ला पोलीस ठाण्याचे वपोनि. अशोक खोत यांना कळविली. ते आपल्या सर्व स्टाफसह घटनास्थानी दाखल झाले. पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन बॅगेची तपासणी केली असता त्यांना त्यात महिलेचा मृतदेह आढळून आला. प्रथमतः ए.डी.आर. क्र. ७३/२३ दाखल करून वरिष्ठांनी सूचना दिल्या. त्यानुसार मृतदेह राजावाडी हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले. त्यांनतर सदर महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.शवविच्छेदन अहवालात सदर महिलेचा कुणीतरी गळा आवळून हत्या केल्याचे निष्पन्न झाल्याने कुर्ला पोलिसांनी गुन्हा रजि. क्र. ४८९/२०२३ कलम ३०२,२०१ भादवि अन्वये दाखल करून तपासाला सुरुवात केली. सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे सह आयुक्त लखमी गौतम, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शशीकुमार मीना यांचे आदेशाने व पोलीस उप आयुक्त प्रकटीकरण १ राज तिलक रौशन यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेअंतर्गत एकुण ८ पोलीस पथके स्थापन करण्यात आली होती. ...पान २ वर

## दोन शेजाऱ्यांचे भांडण रक्तरंजित ठरले माय लेकराला गाडीखाली चिरडून मारले

पारनेर/क्राईम रिपोर्टर



लोकांमध्ये आजकाल भयंकर मानसिक विकृत्या निर्माण झाल्या आहेत. छोट्या छोट्या गोष्टींवरून माणूस चिडतो आणि एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पहात नाही. अहमदनगर जिल्ह्यातील पारनेरमध्ये कुंभार गल्लीत दोन शेजाऱ्यांमध्ये वाद होता. हा वाद इतका विकोपाला गेला की किरण श्रीमंदिलकर नावाच्या इसमाने त्याची शेजारीण शीतल येणारे व तिचा अडीज वर्षांचा मुलगा स्वराज या दोघांच्या अंगावर गाडी घालून त्यांची हत्या केली. याप्रकरणी किरण याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून तो फरार आहे.

घराच्या जागेवरुन झालेल्या वादात माय-लेकाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अहमदनगरच्या पारनेर शहरातील कुंभार गल्लीमध्ये हा प्रकार घडला आहे. आरोपींविरोधात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर आरोपी फरार असून त्यांचा शोध पोलिसांकडून सुरु आहे. घराच्या जागेवरून पारनेर परिसरात राहणाऱ्या श्रीमंदिलकर आणि येणारे कुटुंबियांमध्ये वाद सुरु होते. यावरुन दोन्ही ...पान २ वर

## कोर्टात केस टाकताच जावई चिडला फार रागाच्या भरात त्याने सासूलाच केले ठार

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर

मुले ही आई-वडिलांच्या म्हातारपणाची काठी असतात. कारण त्यांच्या आधारानेच त्यांना आयुष्यातील अखेरच्या दिवसांचा प्रवास करायचा असतो, पण काही मुले कृतघ्न असतात त्यांना आई-वडिलांच्या उपकारांची जाणीव नसते. त्यामुळे आई-वडिलांना मदत करण्याऐवजी त्यांच्या संपत्तीवर डल्ला मारण्यासाठी त्यांचा घातपात करतात. अहमद नगर-कल्याण रोडवर असलेल्या शिवाजी नगरमध्ये लताबाई हि वृद्ध महिला रहायची तिच्या दोन मुलींपैकी धाकटी मीना आणि तिचा पती बाळू त्याच गावात लताबाईच्या शेजारी रहायची, पण मीना आईला मदत करण्याऐवजी तिच्याकडूनच पैसे उकलत असे. पैसे दिले नाही कि व तिचा नवरा बाळू लताबाईंना मारहाण करीत असे. त्यामुळे लताबाईंनी त्यांची पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. तसेच कोर्टात केस दाखल केली. त्यामुळे चिडलेल्या जावयाने लता बाईची हत्या केली. या प्रकरणी आरोपी जावयाला पोलिसांनी अटक केली आहे.



अहमदनगर तालुक्यातील नगर-कल्याण रोडवर असणाऱ्या शिवाजीनगर येथे लताबाई अरूण कडव (वय ७०) रहात होत्या. पतीचे निधन झालेल्या लताबाईंच्या दोन्ही मुलींचे विवाह झाले आहेत. त्यातील विणा नावाची मुलगी बोल्हेगाव फाटा (नगर एम. आय. डी.सी. जवळ) अण्णा प्रभाकर ढेरे (वय ५२) यांना दिली आहे. तिला दोन मुली गौरी, नेहा आणि मुलगा ओम ही अपत्ये आहेत. तिचे पती अण्णा ढेरे हे आडते बाजारात काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. लताबाई यांची दुसरी मुलगी मीना हिचा विवाह बाळू बोधले याच्याशी झाला आहे, पण मीना सासरी न नांदता आईच्या शेजारीच राहू लागली. ती, तिचा पती बाळू आणि मुले हे सगळे कुटुंब लताबाई यांच्या ...पान २ वर

## दुबईवारी हुकल्याने संतापली फार एकाच ठोशात पतीला केले ठार

पुणे/क्राईम रिपोर्टर



एक काळ असा होता कि पत्नीची पती समोर मान वर करून बोलण्याची हिम्मत होत नसे. पण आता महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समानतेचा दर्जा मिळाला आहे. कायदेही महिलांच्याच बाजूने आहेत. त्यामुळे काही शिकल्या सवरलेल्या हाय सोसायटीतील महिला पतीला जुमानत नाहीत. पतीवर हात उचलायलाही मागेपुढे पहात नाहीत. पुण्याच्या वानवडीतील गंगा सॅटेलाइट या हाय सोसायटीत रहाणाऱ्या एका महिलेने पतीने वाढदिवस साजरा करण्यासाठी दुबईला नेले नाही म्हणून पतीच्या नाकावर एक जोरदार ठोसा मारला तो इतका जबरदस्त होता की पती तत्काळ जमिनीवर कोसळला आणि त्याचे निधन झाले. या प्रकरणी आरोपी पत्नीला पोलिसांनी अटक केली आहे.

लग्नाच्या वाढदिवशी गिफ्ट न दिल्याच्या कारणावरुन झालेल्या भांडणात पत्नीने पतीच्या नाकावर जोरदार ठोसा लगावला. त्या घटनेत पतीचा मृत्यू झाला. पुण्यातल्या वानवाडी भागात ही घटना घडली आहे. वानवाडी भागात गंगा सॅटेलाइट नावाची उच्चभ्रू ...पान २ वर


## मोतीराम सजा भोगून येताच शेषराव पेटला बापाच्या खुनाचा २८ वर्षांनी बदला घेतला



मयत मोतीराम

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

'खून का बदला खून' हे फक्त हिंदी सिनेमातच बघायला मिळायचे, पण प्रत्यक्ष जीवनातही अशा घटना घडत आहेत. बापाच्या खुनाचा राग मनात असलेल्या मुलगा सुडाने पेटलेला असतो आणि तो संधीची वाट पहात असतो. त्यासाठी त्याची कितीही वर्ष थांबायची तयारी असते. कारण त्याच्या मनातील सुडाची भावना संपलेली नसते. बुलढाण्याच्या सुनगाव येथील शेषराव यांच्याही मनात सुडाची भावना होती म्हणूनच त्याने २८ वर्षानंतर बापाच्या मारेकऱ्याचा खून करून बदला घेतला. पोलिसांनी शेषराव याला अटक केली आहे.



आरोपी शेषराव

१० नोव्हेंबर शुक्रवार धनत्रयोदशीची मंगलमय पहाट. सुनगांवमध्ये पहाटेच अंगणात, घराबाहेरील रस्त्यावर सडा टाकून गृहिणी रांगोळ्या काढत होत्या. दरम्यान भल्या पहाटे गावातील मोतीराम धुळे हे गोरक्षनाथ नदीजवळच्या रस्त्यावर मृतावस्थेत पडून असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु झाली. ती चर्चा मोतीराम धुळे यांचा पुतण्या रवींद्र धुळे यांच्याही कानावर गेली. त्यामुळे त्यांनी त्वरित दुचाकीने गोरक्षनाथ नदीकडे धाव घेतली. या घटनेची खबर जळगाव (जामोद) पोलिसांना देण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता जळगाव (जा) पोलीस स्टेशनचे ठाणेदार झांबरे, पोउपनिरी शशीकांत दोडके सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी ...पान ६ वर

## मित्राच्या बायकोच्या नादी लागून फसला बाईलवेडा संभाजी जीव गमावून बसला

कवठेमहंकाळ/क्राईम रिपोर्टर



मयत संभाजी

कितीतरी जिवलग मित्र असला तरी त्याला उंबरठ्याच्या आत घेता नाही. कारण काही मित्रांची नियत खराब असतात. मित्राच्या घरी जाणे येणे ठेवतात, पण त्यांच्या मनात माप असतील आणि याच पापातून मित्राच्या घरातील बायकांवर त्यांची वाईट नजर असते. कवठेमहंकाळ येथील संभाजी आणि सुनील हे दोघे जिवलग मित्र होते. दोघांनी भागीत शेती व्यवसाय करायचे ठरवले. त्यासाठी संभाजीने सुनील याला मोठे कर्ज दिले आणि याच कर्जाचा फायदा घेऊन त्याने सुनील याच्या बायकोशी अनैतिक संबंध जुळवले आणि तिच्या घरी राजरोसपणे येऊ लागला. हे सुनीलला समजतात सुनील चिडला. त्याने संभाजीची मैत्री तोडली. त्यामुळे चिडलेला संभाजी त्याच्याकडे कर्जाने दिलेले पैसे मागू लागला. त्यातून दोघांमधले वाद आणखी वाढले आणि एके दिवशी सुनील अत्यंत हुशारीने बेसावध असलेल्या संभाजी याची निर्घृणपणे हत्या केली. याप्रकरणी पोलिसांनी सुनील याला अटक केली आहे.

संभाजी शिंदे याचे लगंरपेठ येथील एस.टी स्टॅन्ड शेजारी किराणा दुकान आणि जनरल स्टोअरचे दुकान आहे. ...पान ६ वर

## अज्ञात मारेकऱ्याचा प्लान यशस्वी ठरला निकिता पाटील हिचा गळा कुणी चिरला?

धुळे/क्राईम रिपोर्टर

महिलांच्या सुरक्षेबाबत महाराष्ट्र सरकारने किती जरी दावे केलेले असले तरी महिलांवरील अत्याचार काही थांबलेले नाहीत. त्यामुळे आजही महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अधांतरीच आहे. धुळ्यातील नकाणे रोड भागात घरात एकटीच असलेल्या एका तरुणीची अज्ञात मारेकऱ्यांनी गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून हि हत्या कोणी आणि कोणत्या कारणाने केली याचा पोलीस शोध घेत आहेत.



धुळे शहरातील नकाने रोड परिसरात एका २२ वर्षीय तरुणीची चाकूने गळा चिरून निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. घरात घुसून अज्ञानाताने तरुणीची हत्या केल्याच्या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरु केला आहे. तर तरुणीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. निकिता कल्याण पाटील असं हत्या झालेल्या २१ वर्षीय तरुणीचे नाव असून राहत्या घरातच अज्ञाताने तिची गळा चिरून तिची हत्या केली आहे. धुळे शहरातील बालाजी नगर भागातील विघ्नहर्ता हॉस्पिटलच्या पाठीमागे पाटील कुटुंबीय राहते. बुधवारी संध्याकाळी घरी कोणी नसल्याचे पाहून अज्ञात आरोपीने थेट घरात घुसून तरुणीची गळा चिरून हत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस श्वानपथकासह घटनास्थळी दाखल झाले होते. निकिताचे वडील ...पान ६ वर

27 NOV TO 03 DEC 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 11/25/2023 9:11 PM Page 1



पान १ वरून...

## कौटुंबिक भांडण जीवघेणे ठरले...

२ मुलांना धरणात फेकून त्यांची हत्या केली आणि स्वतःही धरणाच्या पाण्यात उडी टाकून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला पण तिला वाचवण्यात यश आले. हिंगोलीच्या कळमनुरी तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली. कळमनुरी तालुक्यातील मोरगव्हाण गाव शिवारात पती पत्नीचा कौटुंबिक वाद चिघळला आणि पत्नीनं टोकाचं पाऊल उचललं. काही क्षणात आईने रागाच्या भरात मुलांना धरणाच्या पाण्यात टाकून दिले. मुलांना आई आपल्याला असं पाण्यात टाकून देणार आणि आपली निर्दयी हत्या करणार आहे, अशी कल्पना देखील मुलांना आली नसावी आणि पाठोपाठ आईने देखील पाण्यात उडी घेतली. मुलांचा यामध्ये दुर्दैवी मृत्यू झाला तर आईला गावातील नागरिकांना वाचवण्यात यश आले आहे. ती अमोल खंदारे व अमृपाली खंदारे असं या पती पत्नीचे नाव असून यामध्ये पती पत्नीच्या भांडणात हिंसाचाराच्या घटनेतून स्वतःच्या आईने दोन चिमुकल्यांना सोबत घेऊन ईसापुर धरणामध्ये उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत दोन चिमुकल्यांचा धरणात बुडून मृत्यू झाला आहे. तर आईला वाचवण्यात ग्रामस्थांना यश आलं आहे. मृत मुलांमध्ये ३ वर्षाचा प्रणव खंदारे आणि ५ वर्षीय आरुष खंदारेचा समावेश आहे. दरम्यान, पोलिसांनी दोन्ही चिमुकल्यांचे मृतदेह पाण्याच्या बाहेर काढत कळमनुरीच्या शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल केले होते. तर रात्री उशिरापर्यंत शवविच्छेदन प्रक्रिया सुरू होती. रात्री उशीराने मुलांवर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. या घटनेतील चिमुकल्याच्या आईवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेत सध्या तरी कळमनुरी पोलीसात गुन्हा दाखल झाला नसल्याची माहिती पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंढे यांनी दिली आहे.

## प्रेमाला नकार देणे हवाई सुंदरीला...

राहयला होता. अफनान ही हवाई सुंदरी असल्याने तिला ही चांगला पगार होता. मंगळूर ते उड्डपी अंतर जास्त नसल्याने ती दोन तीन दिवसातून उड्डपी येथील आपल्या घरी जात येत होती.त्यावेळी कधी कधी तिच्यासोबत प्रविण ही असायचा त्याला अफनानच्या घरचे लोक अी ओळखत होते. खरे तर त्या दोघात मैत्रीचे संबंध असल्याने अफनान ही त्याचसोबत जास्त सलगी करीत नव्हती. ती त्याला आपला चांगला मित्र मानत होती. परंतु प्रविणच्या मनात मात्र वेगळेच होते.तो तिच्यावर प्रेम करीत होता. त्याने आतापर्यत कधीच तिच्यासमोर आपले प्रेम व्यक्त केले नसल्याने अफनान देखील गाफील होती. हल्ली तो तिच्यासोबत जास्त जास्त जवळीक साधत बोलत असायचा परंतु तिला त्याचे वागणे खटकत होते. ती त्याला टाळत होती. ती आपल्याला टाळत आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर तो मनातून खचला होता.त्याला ती आवडत असल्याने कसे तर करून तिला आपले करायचे याचा तो विचार करीत होता. हल्ली ती त्याला किमंत देत नव्हती.त्यामुळे तो तिच्यावर चिडला होता. एकदा दोनदा त्याने तिच्यासमोर आपल्या प्रेमाची कबुली देऊन मी तुझ्याशी विवाह करण्यास तयार आहे असे तो तिला म्हणाला. तिच्यावर चांगले संस्कार झाले असल्याने आणि तिचे घरचे लोक जे सांगतील ते ती करणार असल्याने तिला प्रेम वगैरे या गोष्टीत कसला इटरेस्ट नव्हता. त्यामुळे त्याने प्रेमाची कबुली दिल्यावर तिने त्याला सरळ सांगितले की, मी माझे घरचे आई वडिल ज्याच्याशी सांगतील त्याच्याशीच विवाह करणार आहे.मला माझे करियर करायचे असल्याने मला असल्या फालतु कामात लक्ष दयायला वेळ नाही.तिने त्याचे प्रेम झिडकारल्याने तो नाराज तर झालाच पण ती आपल्याला मिळत नाही म्हटल्यावर तिला आपल्या शिवाय दुसऱ्या कोणाची होऊ दयायचे नाही असे त्याने ठरविले. खरे तर तिच्या दृष्टीने त्याचा विषय संपलेला होता. तो मात्र वेगळ्याच विचाराने त्रस्त होता. त्याच्या डोक्यात सैतानी विचार येत होते. त्याने ज्यावेळी तिला प्रेमाची मागणी घातली त्यावेळी तिच्या आईने ही त्याला तू माझ्या मुलीपासून दूर राहा असा सल्ला दिलेला होता. उड्डपी येथे अफनान हिच्या घरी मागे त्याचे जाणे येणे असल्याने तिच्या घरी कोण कोण असतात हे त्याला माहित होते. दिवाळी सणाच्या निमित्याने अफनान हिने चार दिवसाची सुट्टी घेऊन घरी राहिली होती. नेमके याच संधीचा फायदा घ्यायचा हे प्रविण चौगुले याने ठरविले.

रविवार दि.१२ नोव्हेंबर रोजी तो दुपारी मंगळूर हून उड्डपीला आला. दिवसभर त्याने इकडे तिकडे फिरून काढले.या दरम्यान त्याने बाजारातून एक धारदार चाकू आणि एक स्कार्प विकत घेतला. रात्री ११च्या पुढे तो नेऊर येथील तृप्तीनगर येथे अफनान हिच्या घराजवळ गेला. रात्रीच्या अंधरात त्याने कंपाऊंडमागून घरात प्रवेश केला. घरात त्यावेळी अफनान आणि आयनाज या दोघी बेडरूममध्ये होत्या. किचनमध्ये स्वयंपाक घरात आई हसीना या होत्या. तर वयोवृध्द हजिरा या आपल्या रुममध्ये होत्या. तर लहान असीम हा बाहेर गेला होता. याच दरम्यान प्रविण चौगुले हा आपल्या चेहऱ्यावर मास्क ओढून त्या दोघीच्या बेडरूममध्ये शिरला. घरातील बेडरूममध्ये कुणी तरी मास्क ओढून हातात धारदार चाकू घेऊन शिरल्याचे बघून अफनान हिने आरडाओरडा केला. त्यावेळी त्याने तिच्या मानेवर व पोटावर चाकूने सपासप वार केले. तिला वाचविण्याचा प्रयत्न आयनाज करीत असताना तिच्यावर ही त्याने धारदार चाकूने वार केले. त्या दोघीचा आरडा ओरडा ऐकून किचनमधून हसीना या आल्या असता त्याने त्याच्या ही पोटात चाकू खुपसला. त्या तिघीच्यावर कुणी तरी वार केल्याचे आणि त्याचा आरडा ओरडा ऐकून सासू हजिरा या बाहेर आल्या असता त्याची धाकधुक वाढली. समोरच्या व्यक्तीच्या हातात धारदार चाकू असल्याने त्याची बोबडीच वळाली. त्या ही ओरडत असताना त्याने त्याच्यावर ही चाकूने वार केले. मात्र त्यांनी स्वतःला सावरत कसे तरी बाथरूममध्ये बंद करून घेतले. घरातील आरडा ओरडा बघून बाहेर गेलेला बारा वर्षीय असीम हा दरवाज्यातून आत येत असल्याचे बघून प्रविण चौगले याने त्याचेवर ही चाकूने वार केले. हसीना अफनान, असीम आणि आयनाज हे चौघे ही रक्तच्या थारोळ्यात पडले.

घरात सगळीकडे रक्ताची रांगोळी घातली गेली होती. या चौघांना मारून कोणाला काही समजण्याच्या आधीच प्रविण चौगले याने तेथून काढता पाय घेतला आणि पळून गेला. देशात दिवाळीचा सण साजरा होत असताना उड्डपीतील नेऊर येथील तृप्तीनगर येथे मात्र रक्ताचा सडा घातला गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी या घटनेची माहिती शेजाऱ्यांना समजली. त्यांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. घरचे चारजण रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. तर वयोवृध्द हजिरा या कुठे दिसत नसल्याने काहीनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. त्याचा शोध घेत असताना त्या बाथरूममध्ये गंभीर जखमी अवस्थेत पडल्याचे त्यांना दिसले त्यांनी त्यांना उपचारासाठी लगेच जवळच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले. कुणी तरी या घटनेची माहिती नेऊर पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. एकाच घरातील चार लोकांची हत्या झाल्याने पोलीस ही चक्रावून गेले. घटनास्थळी पोलीसांनी श्वानपथकाला आणि ठसेतज्ञाना पाचारन केले. सर्व काही सोपस्कर पुर्ण करीत पोलीसांनी या घटनेचा पंचनामा केला. घटनास्थळी जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ.अरूण कुमार यांनी भेट देऊन या घटनेची माहिती घेतली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना केल्या. सदरचे चार जणांचे हत्याकांड हे चोरीच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तीकडून केले गेले असावे असा अंदाज पोलीसांनी बांधला. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता त्या सीसीटीव्हीमध्ये २५ ते ३० वर्षीय वयोगटातील व्यक्ती दिसत होती. चोरीच्या उद्देशाने त्या व्यक्तीने हे हत्याकांड केले असावे म्हणून त्या दृष्टीने तपासला सुरूवात केली परंतु घरातील कोणतीही वस्तु हलली नव्हती. पोलिसांनी हे चारही मृतदेह ताब्यात घेऊन उतरीय तपासणीसाठी नेऊर येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले. या घटनेला दोन तीन दिवस उलटले तरी यातील संशयीत आरोपी पोलिसाच्या रडावर येत नव्हता. मयत व्यक्तीच्या संपर्कात कोण कोण येत होते याची माहिती पोलीसांनी घेतली असता मयत व्यक्तीच्या घरी अफनान हिचा मित्र मंगळूर येथील विमान सेवेतील क्रुर मेंबर प्रविण अरूण चौगले या येत असल्याची माहिती मिळाली. शिवाय या घटनेपासून त्याचा मोबाईल नंबर ही बंद लागत होता. त्याने अफनान हिला लग्नाची मागणी घातली असल्याची व तिने लग्नास नकार दिल्याचे पोलीस तपासात उघड झाल्यावर सीसीटीव्ही फुटेजमधील व्यक्ती ही दुसरी तिसरी कुणी नसून प्रविण चौगले हा असल्याची पोलीसांची खात्री झाली. इकडे पोस्ट मार्टम नंतर हे चार ही मृतदेह पोलिसांनी नातेवाईकांच्या ताब्यात दिले. त्यानंतर त्याचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेनंतर सासू हजिरा (वय ७०) यांना धक्का बसल्याने त्याची मानसिक अवस्था देखील बिघडली होती. पोलीस आपल्या परीने संशयीत आरोपी प्रविण चौगुले याचा शोध घेत असतानात त्याचा मोबाईल लोकेशन बेळगावी जवळील कुडची येथे दाखवत होते.

उड्डपी पोलीसांनी बेळगावी पोलीसाशी संपर्क साधत कुडची येथे नातेवाईकाच्या घरात लपून बसलेल्या प्रविण चौगले याला ताब्यात घेऊन उड्डपी येथे आणले. त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. वेगवेगळी दिशाभुल करणारी करणारी कारणे सांगत होता. त्याला पोलीशी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती दिली. त्याने दिलेल्या माहितीवरून अफनान हिने त्याला लग्नास नकार दिल्याने त्याने हे हत्याकांड केल्याचे पोलीसाच्या लक्षात आले. या घटनेची फिर्याद मयत व्यक्तीच्या नातेवाईकांकडून घेऊन हसीना (वय ४६), अफनान (वय २३) आयनाज (वय २१) आणि असीम (वय १२) याच्या हत्याकांड प्रकरणी आणि वयोवृध्द हजिरा (वय ७०) यांना गंभीर रित्या जखमी केल्या प्रकरणी प्रविण अरूण चौगुले (वय २८) याच्या विरोधात आयपीसी कलम३०२, सह इतर कलमाखाली अटक करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि मास्क ताब्यात घेतले. या घटनेचा पुढील तपास उड्डपी पोलीस करीत आहेत. प्रेमात नकार मिळाल्यावर ती व्यक्ती सैरभैर होते. त्याला कशाचेच भान आणि चित राहत नाही, तो तिच्यासाठी वेडापीसा झाला असल्याने काही ही करून तो टोकाचा निर्णय घेतो आणि अपसुक खूनाच्या गुन्हयात अडकतो हेच या घटनेवरून दिसून येते.

## 'लिव्ह इन'मधले त्यांचे नाते अल्पजीवी...

सदर पोलीस पथकांनी अहोरात्र मेहनत करून मृतदेह मिळाल्याचे ठिकाणाचे आजुबाजुचे परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले तसेच गुप्त बातमीदारांमार्फत मयत मुलगी हीची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. सदर तरूणी च्या मृतदेहचे फोटो काढून सोशल मीडियावर सर्व पोलिस ठाणे यांना कळविण्यात आले. सर्व पो.ठाणे व क्राईम ब्रँच युनिट अलर्ट झाले. सर्व युनिट व कुर्ला पोलीस ठाणेचे पथक आरोपी व नातेवाईक यांच्या मागावर लागले, खबरे, सीसीटिवी फुटेज तांत्रिक माहिती आदीचा वापर करीत असताना सदर महिला ही धारावी येथे राहात असल्याची माहिती मिळाली. सदर ठिकाणी माहिती घेतली असता, ही महिला भाड्याने राहात होती. तीचे सोबत तीचा नवरा ही राहातो. ते मूळचे ओडिसा राज्यातील आहे. परंतु तीचा नवरा त्याची बहिण आजारी असल्याने तो गावी गेल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहीतीच्या आधारे मयत मुलीची ओळख पटवून त्यानंतर तीचेसोबत लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहणारा तिचा प्रियकर याचा शोध घेण्यासाठी युनिट ५ व ११ च्या पथकाने लागलीच उचल खाऊन आरोपीच्या मागावर राहिली. आरोपी हा ज्या एक्स्प्रेसने ओडिसाला पळून जाणार होता, ती एक्सप्रेस हेरून गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून आरोपीला ठाणे स्टेशन येथून ताब्यात घेतले. तेथून युनिट ५ च्या ऑफिसला आणले. त्याची कसून चौकशी केली असता गुन्ह्याची माहिती पुढे आली ती अशी! अक्सर बरला (वय २३) असे या संशयित आरोपीचे नाव असून तो प्रतीमा पवल कीसपट्टा (वय २५) हिच्या सोबत लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये धारावी येथे राहत होता. दोघेही ओडिशा येथील राहणारे होते. 'लॉकडाइन'मध्ये स्पेशल बसेस सोडल्या होत्या त्या बसमध्ये प्रतिभा व अक्सरची ओळख झाली. दोघेही ओडिसा येथील एका तहसिल मधील जवळ पास गावी राहणारे .त्यामुळे मैत्री वाढत गेली. त्यातून त्यांच्या गाठीभेटी होत गेल्या.' तो बंगलोर येथे मजूरीचे काम करायचा तर ती घरकाम करायची तेथेच राहत होती. परंतु काही कारणाने तीचा मालकीण सोबत वाद झाला .तीने ती नोकरी सोडली आणि त्याचा जॉब सुटला. त्यामुळे दोघेही मुंबई धारावी येथे भाडयाने खोली घेइन राहु लागले. जवळजवळ महिना झाला असेल त्यात दोघांचे आर्थिक चणचणी मुळे वाद निर्माण झाले. प्रतिभा फोनवर तासन् तास बोलते .छानपैकी नटते मुरडते, काम धंदा काही करीत नाही, असे नाना विचार त्याच्या डोक्यात येत होते .त्याच्या डोक्यात संशयाचा कीडा वळवळत होता .त्यामुळे दोघात खटके उडत होते. तशी ती २५ वीची आणि २३ वर्षाचा ' त्यात लॉकडाइन पासून आलेले संबंध आणि धारावीत ते रिव रिलेशन मध्ये राहात. त्यात तो एका दुकानात रोजंदारी वर सामोसे बनवायला होता. एकंदरीत तीच्या चारित्र्याच्या संशय घेत होता.याच रागातून १८ नोव्हेंबर रोनी प्रतिभा व अक्सर मध्ये वाद होवून आरोपीने राहत्या घरात तीचा खुन केला व नंतर तीचे प्रेताची विल्हेवाट लावण्याकरीता प्रेत बॅगेत भरून रात्रीचे सुमारास सदरची बॅग सीएसटी ब्रिज खाली मेट्रो कन्स्ट्रक्शन साईटवरील दोन बॅरीकेटसमध्ये आणुन टाकून पळून गेला मात्र तो ओडिसा आपल्या गावी पळून जात असताना नेमका त्याच्या मागावर असलेल्या गुन्हे अन्वेषण विभाग ५ आणि११ च्या पथकाने अक्सर बरला रा. एम जी नगर रोड, धारावी याच्या मुसक्या आवळल्या. लिव्ह इन रिलेशनशिप मधील तरूणीची हत्या करून प्रेताची विल्हेवाट लावण्याकरीता तीचे प्रेत बॅगेत भरून टाकणा-या आरोपीतास गुन्हे शाखेकडून ३६ तासात अटक करण्यात आली. सदरची यशस्वी कामगिरी पोलीस आयुक्त, मुंबई विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त, मुंबई, देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), लखमी गौतमअपर पोलीस आयुक्त (गुन्हे)शशीकुमार मीना, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), राज तिलक रौशन, सहा. पो. आयुक्त (मध्य), दत्तात्रय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ११ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक चव्हाण, व कक्ष ५ चे प्र.पो.नि. घनश्याम नायर, पो. नि. अजित गोंधळी, सपोनि अमोल माळी, सपोनि अभिजीत जाधव , पोउपनि विजय बेंडाळे, सपोउपनि अंकुश न्यायनिर्गुने, दिपक काळे, रामदास मंतर, सुधिर तरटे, पोहवा इक्बाल सिंग, इंद्ररोज गायकवाड, गिरीष सुर्वे, अजय कदम, सुमिता शिंदे, विजय देशमुख यांनी केली आहे.

## दोन शेजाऱ्यांचे भांडण रक्तरंजित ...

कुटुंबियांमध्ये नेहमीच खटके उडत असत. मात्र गुरुवारी या वादाने टोक गाठलं आणि दोन जणांचा जीव यामध्ये गेला आहे. गुरुवारी संध्याकाळी किरण श्रीमंदिलकर आणि येणारे कुटुंबात पुन्हा वाद झाला. यावेळी किरण याने शितल येणारे आणि अडीच वर्षाचा स्वराज येणारे यांच्या अंगावर गाडी घातली. यामध्ये शितल आणि स्वराज यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. याप्रकरणी मृत महिलेची सासू चंद्रकला येणारे यांच्या फिर्यादीवरून किरण श्रीमंदिलकर याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर आरोपी फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. श्रीमंदिलकर आणि येणारे हे कुटुंब शेजारी शेजारी राहतात. घराशेजारच्या जागेच्या मोजणीतून दोन्ही कुटुंबात वाद होता आणि त्यातूनच ही घटना घडली असल्याचा आरोप येणारे कुटुंबियांनी केला आहे.

## कोर्टात केस टाकताच जावई चिडला...

शेजारीच रहात होते. दोनच मुली असल्याने आपल्याला म्हातारपणाचा आधार होईल या भावनेने लताबाई या मुलगी मीनाला मदत करत होत्या. लताबाई ७० वर्षाच्या असल्या तरी आजही त्या स्वावलंबनाचे जीवन जगत होत्या. त्या रूई पानाच्या माळा बनवण्याचे काम करत. दर शनिवारी त्या मारूती मंदिरासमोर रूईच्या माळा आणि फुले विकून आपली गुजराण करत. त्यांची थोडी-फार शेती आहे. अर्थातच त्यामुळे त्यांना कुणावर अवलंबून रहावे लागत नव्हते. मीनाने आपल्या आईशी गोड बोलून काही शेती स्वतःच्या नावावर करून घेतली आहे, तसेच आईकडून काही पैसे घेवून घरही बांधले आहे. लताबाईने मीनाला पैसे आणि थोडी-फार शेती दिली आहे, पण लताबाईचे दुर्दैव असे की या वयातही त्यांना पोटासाठी काम करावे लागत होते, कारण त्यांची मुलगी त्यांच्याकडे दुर्लक्ष करते. ती फक्त आईकडे पैसे मागायला येते. लताबाईने ते दिले नाही ती आणि तिचा नवरा बाळू बोधले हे दोघेही त्यांना शिवीगाळ करत होते. कधी-कधी मारहाणही करत. म्हाताऱ्या आईला न सांभाळता ते तिला त्रास देत. हा प्रकार वारंवार होत असल्याने कंटाळलेल्या लताबाई यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात लेक आणि जावयाविरूध्द तक्रारी दाखल केल्या होत्या. तसेच लेक-जावई आपल्याला सांभाळत नाहीत म्हणून अहमदनगर न्यायालयात पोटगीची केसही दाखल केली. तो दावा दाखल झाला असून त्याच्या तारखा सुरू असून त्याचा निकाल लताबाई यांच्या बाजूने लागण्याची शक्यता होती, त्यामुळे लताबाई आणि लेक-जावयामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले, शिवाय गावात बदनामी होत होती ती वेगळीच. त्यामुळेच लताबाई यांच्याबद्दल लेक आणि जावयाला राग होता. श्रावण महिना सुरू झाला होता. बुधवार दि. ३० ऑगस्ट २०२३ रोजी रक्षाबंधनाचा सण होता. नेहमीप्रमाणे लताबाई या मानलेला भाऊ शिवाजी निवृत्ती काळे यांच्याकडे राखी बांधण्यासाठी हिवरेझरे येथे गेल्या. भावाला राखी बांधून त्या घरी परत आल्या, पुन्हा दुसऱ्या दिवशी जाणार होत्या. 'रूईची पाने तोडून झाल्यावर मी तुम्हाला फोन करेन, तेंव्हा मला तुम्ही न्यायला या' असा त्यांनी शिवाजी काळे यांना निरोप दिला होता. दि. ३१ ऑगस्ट २०३१ रोजी सकाळी साडे सहा वाजता जवळच असणाऱ्या शेतात त्या रुईची पाने तोडण्यासाठी गेल्या, पण ११ वाजले तरी त्या घरी परतल्या नव्हत्या. इकडे हिवरेझरे येथे शिवाजी काळे तिच्या फोनची वाट पहात होते. त्यांनी आपली आपली गाडी बाहेर काढली आणि ते शिवाजीनगर येथे गेले. लताबाई घरी नव्हत्या, त्यामुळे शिवाजी विचारात पडले. लताबाई ज्या शेतात पाने तोडायला जात, त्याठिकाणी जाऊन पहावे या विचाराने ते तिकडे गेले. तेंव्हा त्यांना रूईच्या झाडाखाली लताबाईचा चष्मा, पांढरी गोणी आणि काचेच्या बांगड्याचे तुकडे या वस्तू दिसून आल्या, पण लताबाई काही दिसल्या नाहीत. ही परिस्थिती पाहून त्यांनी लताबाईचा दुसरा जावई अण्णा ढेरे यांना फोन केला. त्यांना सर्व हकीकत सांगितली, तेंव्हा ते शिवाजीनगर येथे आले. अण्णा ढेरे, शिवाजी काळे आणि काही नातेवाईक यांनी लताबाईंचा शोध घेत होते. तिच्या मोबाईलवरही फोन लावला, पण तो बंद लागत होता. या सगळ्या परिस्थितीवरून लताबाईचे जावई आणि भाऊ यांना त्यांचा घातपात झाला असावा अशी शंका येऊ लागली, तरीही त्यांनी आपला शोध सुरू ठेवला.

अखेर दिनांक ४ सप्टेंबर २०२३ रोजी त्यांनी नगर तालुका पोलीस स्टेशन गाठले तेथे प्रभारी अधिकारी असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक शिशिरकुमार देशमुख यांची भेट घेऊन सर्व हकीकत सांगितली. सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख यांनी उपनिरीक्षक युवराज चव्हाण यांना बोलावून घेऊन त्यांना या सर्व गोष्टीची माहिती दिली. सर्वप्रथम मिसिंग दाखल करून मीना आणि बाळू विधाते यांच्यावर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना दिल्या. लताबाई यांचे दुसरे जावई अण्णा ढेरे यांच्या फिर्यादीवरून मिसिंग नंबर ५४/२०२३ दाखल झाली आणि तपास सुरू झाला. नगर तालुका । पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिशिरकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक युवराज, हवालदार सुहास थोरात, पोलीस नाईक शिवाजी माने, कमलेश पाथरूड, विक्रांत भालसिंग, सागर मिसाळ, राजू खेडकर आणि महिला कॉन्स्टेबल बावळ यांनी तपास सुरू केला. सर्वप्रथम उपनिरीक्षक युवराज चव्हाण यांनी लताबाई कडव यांचे मानलेले भाऊ शिवाजी काळे आणि जावई अण्णा ढेरे यांच्याकडून सविस्तर हकीकत जाणून घेतली. त्यानंतर घटनास्थळी म्हणजे लताबाईच्या बांगड्यांचे तुकडे, चष्मा मिळाला त्या रूईच्या झाडाच्या ठिकाणाचा पंचनामा केला. तसेच पोलिसांनी संशयावरून मीना विधाते आणि बाळू विधाते यांना ताब्यात घेतले. त्यांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले. पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख यांनी चौकशी सुरू केली, पण बाळू ताकास तूर लागू देत नव्हता. अखेर त्या दोघांची स्वतंत्रपणे चौकशी करून त्यांना चौदावे रत्न दाखवले. त्यानंतर ते दोघे ठिकाणावर आले. मीना आणि बाळू यांनी लताबाईची काही जमीन आपल्या नावावर करून घेऊन तिच्या पैशावरच घर बांधले होते, तरीही ते दोघे तिचा सांभाळ करत नव्हते. तिच्याकडे दुर्लक्ष करत होते. या कारणाने वैतागलेल्या लताबाईंनी न्यायालयात पोटगीची केस दाखल केली होती. या गोष्टीचा राग मीना आणि बाळू विधाते यांना आला होता. त्यांनी तिचा काटा काढण्याचा लॅन केला. गुरूवार दि. ३१ ऑगस्ट २०२३ रोजी लताबाई ही रूईची पाने तोडण्यासाठी जवळच्या शेतात गेली. ती आपल्या नादात पाने तोडत असतांनाच बाळू तिच्यामागे येऊन उभा राहिला. लताबाईला आपल्या मागे कोणीतरी उभे आहे हे समजून आले. तिने मागे वळून पाहिले असता तिचा जावई बाळू उभा होता. लताबाईचे लक्ष गेल्यावर बाळूने 'तू आमच्याविरूद्ध पोटगीची केस का दाखल केलीस?' असे विचारले. त्याचा लताबाईला राग आला, पण ती काहीही न बोलता पुढे जाऊ लागली. तिचे हे वागणे पाहून बाळू आणखीन चिडला. त्याने तिला पकडले. त्या दोघांमध्ये झटापट होऊ लागली. त्यावेळी लताबाईच्या डोळ्यावरचा चष्मा गळून पडला. हातातील बांगड्या फुटल्या. बाळूच्या डोक्यात लताबाईविषयी राग होता. त्याने खाली पडलेला लाकडी दांडका उचलला आणि तिच्या डोक्यात हाणला. त्यासरशी लताबाई बेशुद्ध होऊन खाली पडली. ती कोसळली तसा त्याने अंदाज घेतला, तेंव्हा त्याचा लक्षात आले की तिचा जीव गेला आहे. आपल्या हातून खून झाल्याचे बाळूच्या लक्षात आले. आता बाळूला लताबाईची विल्हेवाट लावायची होती म्हणून तो आपल्या घरी गेला आणि त्याने एक पांढरे गोणपाट घेतले. तो पुन्हा शेतात आला. त्या गोणीत लताबाईचा मृतदेह घाई-गडबडीने कोंबला. ती गोणी त्याने तवेरा गाडीच्या (एम.एच. १६ बी. एच. ६४२६) डिक्कीत टाकली. लताबाईविषयी चर्चा होण्याच्या आधीच विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने तो गाडी कल्याणच्या दिशेने पळवू लागला. यावेळी गाडीचा वेग ८०-९० चा होता. त्याच्या डोक्यात फक्त लताबाईच्या मृतदेहाची विल्हेवाट एका निर्जन ठिकाणी लावायची हाच विचार होता. त्याच विचाराने तो सैरभैर झाला होता. कल्याण रोडने सितेवाडी फाटा येथून जुन्नर रोडने गणेश खिंडी येथे आल्यावर त्याने गाडी थांबवली. आजूबाजूला कोणी नाही हे पाहून तो गाडीतून खाली उतरला. त्यानंतर गाडीतून पांढरे गोणपाट बाहेर काढले आणि ते गोणपाट खांद्यावर घेऊन तो झाडाझुडुपातून पुढे गेला. त्यानंतर ते गोणपाट त्याने तिथे फेकून दिले आणि सुटकेचा निश्वास सोडला. गेली एकदाची ब्याद असे म्हणत तो पुन्हा घरी आला. बाळूने घडलेली सर्व हकीकत सांगितल्यानंतर पोलिसांनी तो मृतदेह ताब्यात घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या. बाळूला सोबत घेत पोलीस पथक, पंच, लताबाईचे नातेवाईक हे सरकारी गाडीतून मृतदेह टाकला त्याठिकाणी गेले. बाळूने सांगितल्याप्रमाणे प्रवास सुरू झाला. जुन्नर तालुक्यातील गणेश खिंडी येथे आल्यावर गणेश खिंडी ते जुन्नरकडे जाणाऱ्या रस्त्यावर बाळूने गाडी थांबवण्यास सांगितली. त्यानंतर बाळू गाडीतून खाली उतरला. त्याच्यासोबत पोलीस पथक, लताबाईचे नातेवाईक गाडीतून खाली उतरले. बाळू पुढे झाडाझुडुपात जाऊ लागला. त्याच्या पाठोपाठ पोलीस पथकही गेले. पुढे जाऊन दरीत पडलेले पांढरे गोणपाट बाळूने पोलिसांना दाखवले. उपनिरीक्षक युवराज चव्हाण यांनी पोलीस पथकाला ते गोणपाट उघडण्यात सांगितले असता त्यामध्ये एक मृतदेह आढळून आला. तो मृतदेह कुजला होता, पण मृतदेहाच्या कपड्यावरून तो लताबाईचा आहे हे त्यांच्या नातेवाईकांनी ओळखले. मृतदेह जुन्नर पोलीस स्टेशनच्या हद्दीत सापडल्याने एक ॲम्ब्युलन्स बोलावून त्यामधून तो मृतदेह जुन्नरच्या ग्रामीण रूग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी पाठवला. तपासणी झाल्याबर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. लताबाईचा दुसरा जावई अण्णा ढेरे यांनी जुन्नर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद नोंदवून गुन्हा क्रमांक ४१०/२०२३ नुसार भा.दं.वि. कलम ३०२, २०१ नुसार लताबाई कडव हिच्या खुनाचा गुन्हा दाखल केला. लताबाई कदम हिचा खून नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडल्याने जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला संभाजीराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली नगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुमार देशमुख, उपनिरीक्षक युवराज चव्हाण व पोलीस पथक करत आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने दि. १५ सप्टेंबर २०२३ पर्यत त्यांना पोलीस कोठडी ठोठावली. पोलीस कोठडीत असतांना पोलिसांनी आरोपीकडून लाकडी दांडा आणि वापरलेली गाडी जप्त केली आहे.

## दुबईवारी हुकल्याने संतापली फार...

सोसायटी आहे. त्या सोसायटीत शुक्रवारी दुपारी ही घटना घडली आहे. निखिल पुष्पराज खन्ना (वय ३६) असं मृत्यू झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी निखिल खन्नाची पत्नी रेणुका खन्नाला अटक केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे यांनी दिलेल्या माहितीनुसार रेणुका आणि निखिल या दोघांचा २०१७ मध्ये प्रेमविवाह झाला होता. निखिल हे हे पत्नी रेणुका आणि त्यांच्या आई वडिलांसह राहात होते. पतीने लग्नाच्या वाढदिवसाला गिफ्ट दिलं नाही तसंच दुबईला घेऊन गेला नाही या कारणावरुन दोघांचं शुक्रवारी भांडण झालं. दुपारी साडेबाराच्या सुमारास रेणुकाने निखिलच्या नाकावर ठोसा मारला. या घटनेत निखिल यांच्या नाकाचं हाड फ्रॅक्चर झालं आणि बराच रक्तस्राव झाला. या घटनेनंतर रेणुकाचे सासरे आणि निखिल यांचे वडील डॉ. पुष्पराज खन्ना यांनी निखिलला सीपीआर देण्याचा प्रयत्न केला. मात्र निखिलने काही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर पोलिसात तक्रार करण्यात आली. यानंतर पोलिसांनी रेणुकाला अटक केली आहे. इंडियन एक्स्प्रेसने या विषयीचं वृत्त दिलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रेणुका आणि निखिल यांचं लग्न २०१७ मध्ये झालं होतं. गंगा सॅटेलाईट या उच्चभ्रू सोसायटीत हे दोघं वास्तव्य करत होते. या दोघांचाही प्रेमविवाह होता, मात्र दोघांमध्ये काही कालावधीतच खटके उडू लागले. निखिलच्या वडिलांनी सांगितलं की आम्ही रेणुकाला अनेकदा समजावलं होतं. मात्र तिच्या वागणुकीत काही बदल झाला नाही. अनेकदा ती भांडण करत असे असं पुष्पराज खन्ना यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटलं आहे. रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरु होती. रेणुका तिच्या पतीसह नाखुश होती. तिला लग्नाच्या वाढदिवसाला दुबईला जायचं होतं. ५ नोव्हेंबर रोजी त्यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. मात्र या दोघांचं भांडण झालं. निखिलने दिलेलं गिफ्ट रेणुकाला आवडलं नाही. यावरुन आणि दुबईला का गेलो नाही? यावरुन त्यांचा वाद झाला. ज्यानंतर रेणुकाने निखिलला ठोसा मारला असं पुष्पराज खन्ना यांनी तक्रारीत म्हटलं आहे.

27 NOV TO 03 DEC 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 11/25/2023 9:12 PM Page 1

CMYK



## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर भीषण अपघात

# भरधाव कारची टँकरला जोरदार धडक, तिघांचा जागीच मृत्यू

**पालघर/प्रतिनिधी**



मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर कारने विरुद्ध दिशेने जाणाऱ्या टँकरला समोरून धडक दिल्याने भीषण अपघात घडला आहे. पालघर जिल्ह्यातील मेंढवण खिंडीत हा भीषण अपघात घडला असून या अपघातात कारचालकसह दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतकांमध्ये पाच वर्षाच्या चिमुकलीचा देखील समावेश असून दोन जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मुंबईहून गुजरातच्या दिशेने जात असलेल्या भरधाव कारचालकाचे कारवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे मेंढवण खिंडीतील धोकादायक असलेल्या वळणावर ही भरधाव कार विरुद्ध दिशेच्या मर्गिकेवर जाऊन समोरून येणाऱ्या टँकरला धडकली. हा अपघात इतका भीषण होता अपघातात कारच्या पुढच्या भागाचा पूर्णतः चक्काचूर झाला आहे. या भीषण अपघातात कारमधून असलेल्या तिघांचा जागीच मृत्यू झाला असून हर्षद गोडबोले (वय ४२), आनंदी गोडबोले (वय ५) व कारचालक मिलिंद वैद (वय ४३) अशी अपघातातील मृतकांची नावे आहेत. त्याचप्रमाणे हर्षदा गोडबोले (वय ३७), अद्वैत गोडबोले (वय १२) हे कारमधील दोन प्रवासी देखील गंभीररित्या जखमी झाले आहेत. या भीषण अपघातानंतर राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळतात पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. अपघातात गंभीररीत्या जखमी झालेल्या दोघांना तातडीने रुग्णवाहिकेच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. जखमींवर कासा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून जखमी दोघांची प्रकृती देखील चिंताजनक आहे. दरम्यान, पोलीस प्रशासनाने राष्ट्रीय महामार्गावर असलेले अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला सारून वाहतूक सुरळीत करण्यात आली. मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मेंढवण खिंडीत असलेल्या धोकादायक वळणावर आजवर अनेक अपघात घडले असून अनेक प्रवाशांना आपला जीव देखील गमवावा लागला आहे. मात्र, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून याबाबत कोणत्याही ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला असून याबाबत रोष व्यक्त केला आहे.

# ३२ लाख पेक्षा जास्त रक्कमेचा अपहार करणारे मनपा अधिकारी सोमनाथ सोष्टे यांचे प्रकरणी विधानसभा तारांकित प्रश्न उपस्थित!

**भिवंडी/प्रतिनिधी**



३२ लाखापेक्षा जास्त रक्कमेचा अपहार करणारे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र-५ चे तत्कालीन सहाय्यक आयुक्त सोमनाथ बुध्या सोष्टे यांचे प्रकरणी विधानसभा हिवाळी अधिवेशनात पारनेरचे आमदार- निलेश लंके यांनी क्रमांक ७४९५४ अन्वये तारांकित प्रश्न उपस्थित केला आहे.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे कि सोमनाथ बुध्या सोष्टे हे प्रभाग समिती क्र.५ येथे सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत असताना नाले व गटर सफाई कामी मेहतताना तत्वावर लावलेल्या मजुरांचे वेतन अदा करणेसाठी रु. ३२ लक्ष ६६ हजार ३४६ इतकी रक्कम अग्रीम (आगाऊ) स्वरूपात घेतली होती. सदर रक्कम खर्च करून त्याचा ताळमेळ तथा उलघडा लेखा विभागात विहित मुदतीत सादर करणे सोमनाथ सोष्टे यांना नियमानुसार बंधनकारक होते. परंतु २ ते ३ वर्षाचा कालावधी उलटून देखील सोष्टे यांनी अशी कोणतीही कार्यवाही केली नाही. सदर प्रकरणी मनपा प्रशासनाने सोमनाथ सोष्टे यांना नोटीस देऊन खुलासा करणेस सांगितला असता सोष्टे यांनी मनपा प्रशासनाने नोटीस दिल्यावर सुद्धा खुलासा मनपा कडे सदर केला नाही. दरम्यानच्या काळात राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष-शरद काशिनाथ धुमाळ यांनी सदर प्रकरणी तक्रार करून पाठपुरावा केल्यामुळे मनपा आयुक्त अजय वैद्य यांचे आदेशानुसार सोमनाथ बुध्या सोष्टे यांचे वेतनातून अग्रीम रक्कमेची वसुली मनपाने सुरु केल्याने समजले. परंतु नियमानुसार सोमनाथ सोष्टे यांना चौकशी साठी निलंबित करून त्यानंतर मनपा सेवेतून बडतर्फ करणे आवश्यक होते. परंतु शरद धुमाळ यांनी मनपा आयुक्त अजय वैद्य यांचेकडे केली- परंतु मनपा आयुक्त अजय वैद्य हे सोमनाथ सोष्टे यांना पाठीशी घालत असल्यामुळे धुमाळ यांनी मुख्यमंत्री व प्रधान सचिव नगरविकास यांचेकडे तक्रार केली आहे तसेच पारनेरचे आमदार- निलेश लंके यांनी सदरचा तारांकित प्रश्न उपस्थित केला आहे. सदर तारांकित प्रश्नाचे उत्तर पूरक टिपणी व सविस्तर अहवाल घेऊन दिनांक २४ नोव्हेंबर २०२३ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना मंत्रालयीन कक्षात उपस्थित राहणेच निर्देश नगरविकास विभागाचे कक्ष अधिकारी रश्मीकांत इंगोले यांनी मनपा आयुक्त अजय वैद्य यांना दिले आहेत. सोमनाथ सोष्टे यांनी लाखो रुपयांचा सार्वजनिक तथा शासकीय रक्कमेच्या अपहार केल्या प्रकरणी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित झाल्यामुळे भिवंडी मनपामध्ये प्रचंड खळबळ माजली आहे.

# लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते फॉग कॅनन धुल नियंत्रण-दमन वाहन मशिनचे लोकार्पण




**लातूर/प्रतिनिधी**

मनपाकडून शहरातील वायु प्रदूषण, रस्त्यावरील धूळ, बारीक माती या यंत्राद्वारे कमी होणार आहे. यासाठी मनपाने कार्यान्वित केलेल्या Dust Suppression वाहन/मशिनचे लोकार्पण जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यासह अधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालय तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, दिल्ली अंतर्गत राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम विभागाकडून लातूर शहर महानगरपालिकेला वायु प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी निधी उपलब्ध झाला.या निधीमधुन लातूर शहर महानगरपालिके मार्फत शहरातील वायु प्रदूषण व घनकचरा व्यवस्थापनासाठी विविध उपयोजना राबवण्यात येत आहेत.त्यापैकी शहरातील वायु प्रदूषण कमी करणे व मेन रोडवरील धूळ कमी करण्याकरिता Dust Suppression वाहन/मशिन खरेदी करण्यात आल्या आहेत. या Dust Suppression वाहन/मशीनद्वारे शहरातील वायु प्रदूषण कमी करण्याकरिता मदत होणार आहे. या मशीनमुळे कमीत कमी मनुष्यबळाचा वापर करून जास्तीत जास्त वायु प्रदूषण कमी होणार आहे. या Dust Suppression वाहन/मशिनचे लोकार्पण जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मशीनचे प्रात्यक्षिकही त्यांच्यासमोर सादर करण्यात आले तसेच या वाहना बाबतची सविस्तर माहिती श्री बोबे यांनी जिल्हाधिकारी महोदय यांना दिले आहे. यावेळी आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त शिवाजी गवळी, उपायुक्त मयुरा शिंदेकर, जिल्हा सह-आयुक्त रामदास कोकरे, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम विभागातील पंडित लोहारे, पर्यावरण सल्लागार राहुल बोबे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

# भिवंडी महापालिकेत यांत्रिकी झाडूचे प्रात्यक्षिक



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील वाढलेले धुळीचे प्रदूषण एक समस्या तयार होत असताना त्यावर स्थानिक पालिका प्रशासनाकडून रस्त्यावरील कचरा, धूळ साफ करणे याकरता विविध उपाययोजना करण्यात येत आहेत याचाच एक भाग म्हणून शहरात यांत्रिकी झाडू मशीन याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. या यांत्रिकी झाडूचे (मेकॅनिकल रोड स्वीपर) मुख्यालय आवारात पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या उपस्थितीत या यांत्रिकी झाडूचे सादरीकरण करण्यात आले.यावेळेला पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,आरोग्य विभाग प्रमुख हेमंत गुळवी, जयवंत सोनवण, वाहन विभाग प्रमुख प्रशांत संखे, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले, अन्य विभाग प्रमुख उपस्थित होते. भिवंडी पालिका मुख्यालय आवारात यांत्रिक झाडूचे प्रात्यक्षिक दाखवल्यानंतर शहरातील साईबाबा ते भिवंडी कल्याण रोड येथे यांत्रिकी झाडूचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. या यांत्रिकी झाडूमुळे रस्त्यावर पाणी मारून रस्त्यावरील धूळ उचलून रस्त्या स्वच्छ होणार आहे. तसेच यांत्रिक झाडू माध्यमातून एकत्रित होणारा कचरा हा व्यवस्थित डंपर मध्ये देखील जमा करता येणार आहे.

यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा न येता,मनुष्यबळाचा कमीत कमी वापर करून अधिक जास्तीचे काम या यंत्राद्वारे करता येईल.शहरात साफसफाई करणे शक्य होणार आहे अशा प्रकारचा यांत्रिकी झाडू खरेदी करण्याचा पालिका आयुक्त प्रशासनाचा विचार आहे जेणेकरून शहर साफसफाई करण्यास पालिकेस फार मोठी मदत होईल,असे पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी या प्रसंगी नमूद केले आहे. नवी यांत्रिक झाडू वाहन खरेदी करताना पालिका प्रशासनाला आपल्या ताफ्यात महापौर प्रतिभा पाटील यांच्या कार्यकाळात महापौर निधीतून २५ लाख रुपये खर्च करून खरेदी केलेल्या एका यांत्रिक झाडू वाहनाचा विसर पडला आहे. मागील कित्येक महिन्यांपासून हे वाहन धूळखात पडून असल्याने किमान नवीन यंत्रसामुग्री खरेदी करण्यापूर्वी आपल्या कडील यंत्रसामुग्रीचा वापर तरी करावा अशी माफक अपेक्षा नागरिकांची आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### वंचित बहुजन कामगार संघटनेची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

लातूर : वंचित बहुजन कामगार संघटनेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेमध्ये अध्यक्षांच्या सुचनेनुसार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या अनुमतीने जिल्हा कार्यकारिणी घोषीत करण्यात आली. घोषीत करण्यात आलेली जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे. जिल्हाध्यक्ष म्हणून याकूब शेख, जिल्हा उपाध्यक्ष नसीर शेख, जिल्हा सचिव मन्सूर शेख, शहराध्यक्ष विशाल शिंदे, शहर उपाध्यक्ष दयानंद उमापुरे, लातूर शहर सचिव ऋषिकेश वाघमारे, लातूर शहराध्यक्ष जनार्दन हंचाटे, लातूर शहर सचिव बालाजी कांबळे आदी पदाधिकार्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद वाघमारे, उपाध्यक्ष नितीन जोगदंड, सचिव पांडुरंग करकिले आदीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने दिसत आहेत. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे संघटनेचे अध्यक्ष यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### डॉ.अभय कुलकर्णी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

लातूर : लातूरचे रहिवासी तथा सोलापूर येथील पीडीयु डेंटल महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक डॉ. अभय कुलकर्णी यांनी लिहिलेल्या दातांचे आरोग्य विषयक गैरसमज दूर करणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच संपन्न झाले. मुंबई येथे आयोजित वर्ल्ड डेंटल शो मध्ये मुंबईचे माजी शेरीफ डॉ. जगन्नाथराव हेगडे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. मराठी, हिंदी, इंग्रजी व कन्नड या चार भाषांमधून हे पुस्तक लिहिण्यात आले आहे. या कार्यक्रमास वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे सहसंचालक डॉ.विवेक पाखमोडे, आयडीएच्या मुंबई येथील मुख्य शाखेचे महासचिव डॉ.अशोक ढोबळे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. बेंगलोर येथील राईट ऑर्डर पब्लिकेशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. सर्वस्थानिक भाषांमध्ये हे पुस्तक प्रकाशित करण्याचा मनोदय डॉ. अभय कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

### संविधान दिवस कार्यक्रमात सहभागाचे आवाहन

मुंबई : संविधानातील आदर्श आणि तत्त्वे अधोरेखित करण्यासह त्यांच्याप्रती वचनबद्धता पुन्हा सुनिश्चित करण्याबरोबरच संविधानाच्या संस्थापकांच्या योगदानाचा सन्मान आणि स्मरण करण्याच्या उद्देशाने, भारतीय संविधानाचा स्वीकार केल्याच्या स्मृती जागवण्यासाठी दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवस साजरा केला जातो. संविधान दिवस साजरा करताना, संसदीय कामकाज मंत्रालयाने सर्व नागरिकांना संविधान प्रश्नमंजुषा आणि उद्देशिकेच्या ऑनलाइन वाचनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. यात अधिकाधिक सहभाग निश्चित करण्यासाठी मंत्रालयाने दोन वेब पोर्टल्स कार्यान्वित केले आहेत. २२ अधिकृत भाषा आणि इंग्रजीमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे ऑनलाइन वाचनासाठी संकेतस्थळ असे https://readpreamble.nic.in/; ऑनलाइन प्रश्नमंजुषा (भारत: लोकशाहीची जननी) : https://constitutionquiz.nic.in/ पोर्टल्स प्रत्येकासाठी उपलब्ध आहेत. यात कोणालाही सहभागी होऊन सहभागाचे प्रमाणपत्र प्राप्त करता येईल. प्राप्त प्रमाणपत्रे SamvidhanDiwas हॅशटॅग वापरून समाजमाध्यम मंचावर पोस्ट करता येतील.

### राज्य कला प्रदर्शनासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईनने कलाकृती पाठविण्याचे आवाहन

मुंबई : राज्य कला प्रदर्शनाचे यंदाचे ६३ वे वर्ष आहे. जहांगीर आर्ट गॅलरी येथे १३ फेब्रुवारी २०२४ रोजी होणाऱ्या प्रदर्शनासाठी राज्यातील कलाकारांकडून ३० नोव्हेंबरपर्यत ऑनलाईन पद्धतीने कलाकृती मागविण्यात येत आहेत. राज्यातील जास्तीत जास्त कलाकारांनी प्रदर्शनात सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रभारी कला संचालक राजीव मिश्रा यांनी केले आहे. रेखा, रंगकला, शिल्पकला, उपयोजित कला, मुद्राचित्रण व दिव्यांग या विभागासाठी राज्याचे रहिवाशी असलेल्या कलावंतांकडून ऑनलाईन स्वरूपात कलाकृती मागविण्यात येत आहे. कला संचालनालयाच्या www.doa.maharashtra या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात कलाकृती सादर करण्याचे आवाहन प्रभारी कला संचालक राजीव मिश्रा यांनी केले आहे. प्रदर्शनातील पारितोषिकपात्र कलाकृतींना प्रत्येकी ५० हजार याप्रमाणे एकूण १५ पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी २२६२०२३१/३२ या क्रमांकावर अथवा directorateofartgmail.com या ईमेलवर संपर्क साधावा.

# बिरसा मुंडा जयंतीनिमित्त वाड्यात भव्य मिरवणुक व सांस्कृतिक कार्यक्रम



**वाडा/प्रतिनिधी**

भुमिपुत्र संघटना वाडा तालुका, आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटना वाडा तालुका व आदिवासी शिक्षक संघटना वाडा तालुका यांच्या वतीने क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त वाडा येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाडा शहरातील पी.जे. हायस्कुल प्रांगणात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करुन वाडा शहरात पी.जे. हायस्कुल, मेनरोड, मशिदनाका, वाणी आळी, भाजी मार्केट, बस स्थानक या परिसरातुन भव्य मिरवणुक काढण्यात आली, तारपा नाच या मिरवणुकीचे आकर्षण होते. पी.जे. हायस्कुल येथे कार्यक्रमाच्या ठिकाणी मान्यवरांनी बिरसा मुंडा यांच्या अभिवादन करुन आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी वाडा शहर व वाडा तालुक्यातील आदिवासी बांधवांनी तसेच बिगर आदिवासी बांधवांनी बिरसा मुंडा यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. या कार्यक्रमाला भुमिपुत्र संघटना वाडा तालुका, आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटना, आदिवासी शिक्षक संघटना वाडा तालुका यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंढरपूर-घुमान ते वैष्णवदेवी सायकल यात्रेसाठी लातूर सायकलिस्टचे १२ जण रवाना

**लातूर/प्रतिनिधी**

भागवत धर्माचे ज्येष्ठ प्रचारक संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची ७५३ वी जयंती संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा ७२७ वा संजीवन समाधी सोहळा व शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक देव यांच्या ५५४ व्या जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर ते पंजाबमधील श्रीक्षेत्र घुमानपर्यंत २१०० कि. मी. रथ व सायकल यात्रा दि. २३ नोव्हेंबर रोजी कार्तिक एकादशीच्या मुहूर्तावर निघाली आहे. या यात्रेमध्ये लातूर सायकलिस्ट क्लबचे खालील सायकलीस्ट सायकलवारी सहभागी झालेले आहेत. रवींद्र भूमकर, गंगाधर बिरादार, संजय महाजन, नागनाथ रवळे, बालाजी गायकवाड, भास्कर आरगडे, विकास बन, सर्जेराव जगताप, युवराज गिरी, प्रवीण खरवळे, योगेश जाधव, मेघराज जाधव, विवेक होळसंबरे या सायकलिस्टचा सहभाग आहे. महाराष्ट्रभरातून सुमारे १०० सायकलिस्ट यात सहभागी झाले आहेत. संत शिरोमणी नामदेव महाराज यांनी भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला. याच सात्विक विचाराला तेवत ठेवण्यासाठी या रथ व सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हा रथ व सायकल यात्रा ही महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणा व पंजाब आदी या राज्यातून मार्गस्थ होणार आहे. यात्रेचा समारोप संत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी दिन म्हणजेच दि. ११ डिसेंबर रोजी पंजाब येथभल श्रीक्षेत्र घुमान येथे संपन्न होणार आहे. यानंतर लातूर सायकलिस्ट क्लबचे सदस्य हे घुमान ते वैष्णोदेवी अशी सायकल वारी करून आपली सायकल यात्रा समाप्त करणार आहेत. लातूर सायकलिस्ट क्लबच्या या बारा वीर सायकलिस्टनी पहाटे गंजगोलाई येथून आई जगदंबेचे दर्शन घेऊन नंतर रेणापूर येथे रेणुकामातेचे दर्शन घेऊन यात्रेस प्रारंभ केला. या सायकल वारीस प्रोत्साहन देण्यासाठी लातूर सायकलिस्ट क्लबचे सदस्य व नागरिक उपस्थित होते.









CMYK

27 NOV TO 03 DEC 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 11/25/2023 9:12 PM Page 1



# फुटीरांना प्यारी भाजपाची ओसरी!

महाराष्ट्राच्या राजकारणात काही लोकांची अवस्था 'धोबी का कुत्ता ना घर का ना घाट का' अशी झालेली आहे आणि त्याला कारणीभूत ते स्वतःच आहेत. ज्या पक्षात ते सन्मानाने राहिले, सन्मानाने नाव इज्जत आणि पैसे कमावले, त्या पक्षाशी गद्दारी केल्यानंतर पुढे काय अवस्था होऊ शकते, हे राष्ट्रवादी आणि शिवसेनेतील फुटीरांची आजची अवस्था पाहून कळू शकते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर, राजस्थानात जाऊन भाजपाच्या उमेदवाराचा प्रचार करण्याची पाळी आली. उद्या अशीच पाळी राष्ट्रवादीतले फुटीर अजित पवार आणि त्यांच्या समर्थकांवर येणार आहे. भाजपाशी सलगी करून या लोकांना काय मिळाले? भाजपाचा आजवरचा इतिहास पाहता, भाजपाने लोकांचा आणि छोट्या छोट्या पक्षांचा फक्त वापर करून घेतला. मग तो मेटेंचा शिवसंग्राम पक्ष, असो राजू शेट्टींचा स्वाभिमानी शेतकरी संघटना असो, की जाणकारांचा राष्ट्रीय समाज पक्ष असो. या लोकांचा भाजपाने आत्तापर्यंत फक्त वापर करून घेतलेला आहे आणि हा इतिहास समोर असताना केवळ सत्तेसाठी शिंदे आणि अजित पवार यांनी त्यांच्या पक्षाशी गद्दारी केली व भाजपाच्या तंबूत आसरा घेतला. आज संपूर्ण देशात भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरुद्ध काय बोलले जात आहे, हे त्यांनी एकदा कान उघडून ऐकावे म्हणजे त्यांना कळेल की आपण पक्षांतर करून चूक केली की योग्य निर्णय घेतला. जर पक्षांतर करून तुम्हाला तुमचे आणि तुमच्या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व अगदी मजबूतपणे टिकवून ठेवणे शक्य होणार नसेल, तर पक्षांतर कशासाठी केलेत? अरे सत्ता काय आज आहे आणि उद्या नाही! उद्या जर महायुतीची सत्ता गेली तर महाराष्ट्र तुम्हाला जोड्याजवळ तरी उभा करेल का? याचा तरी विचार करायला हवा. आज महायुतीचे सरकार कोणाच्या इशाऱ्यावर आणि कशा पद्धतीने काम करते ते संपूर्ण महाराष्ट्र बघतोय. मुख्यमंत्री शिंदे ना छोट्या छोट्या गोष्टीसाठी दिल्लीला चकरा माराव्या लागतात. दिल्लीतील भाजपा पक्षश्रेष्ठींची मर्जी राखण्यासाठी त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. ही एक प्रकारची लाचारी म्हणावी लागेल. मग अशा लाचारीने मिळालेले मुख्यमंत्रीपद काय कामाचे? बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक म्हणून शिंदेंना महाराष्ट्रात किंवा त्यांच्या ठाण्यातील कोपरी मतदारसंघात जी इज्जत होती, जो मानसन्मान होता, तो राहिलाय का? आता राहता राहिला सवाल भाजपाचा! तर भाजपाला या देशात फक्त त्यांचाच पक्ष शिल्लक ठेवायचा आहे. बाकीच्या सगळ्या पक्षांची राख रांगोळी करायची आहे. सुरुवातीला त्यांनी कॉंग्रेसमुक्त भारत असा नारा दिला. उद्या शिंदे गट मुक्त किंवा अजित पवार गट मुक्त महाराष्ट्र असा नारा दिला जाणार नाही याची काय गॅरंटी? मात्र या सगळ्या घडामोडी आमच्या महाराष्ट्राची वाट लागली. महाराष्ट्रात अनेक गंभीर प्रश्न आहेत. महाराष्ट्रात मराठा आरक्षण आंदोलन पेटलेले आहे आणि आमचे मुख्यमंत्री शिंदे तिकडे भाजपच्या उमेदवारांच्या प्रचाराला राजस्थानात. हे योग्य आहे का? याचा विचार आता महाराष्ट्रातील जनतेने करावा किंवा शिंदे गटात असलेल्या नेत्यांनी करावा. भाजपच्या उमेदवाराचा प्रचार करण्याची शिंदेला काय आवश्यकता? केवळ भाजपने मुख्यमंत्री पदाची खुर्ची दिली म्हणून त्यांना खुश करण्यासाठी भाजपच्या उमेदवाराचा प्रचार करता. अरे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री जेव्हा भाजपच्या उमेदवाराचा प्रचार करतो तेव्हा महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकते. याचे कारण महाराष्ट्रात मराठा आंदोलक विरुद्ध ओबीसी समर्थक समोरासमोर उभे ठाकले आहेत. त्यांच्यात केव्हाही संघर्षाची ठिणगी पडू शकते. आणि जर तसेच झाले तर महाराष्ट्रात जो जातीय दंगलीचा वनवा पेटेल, तो शिंदेच काय भाजपाला सुद्धा विझवता येणार नाही. म्हणूनच महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आणि उपमुख्यमंत्र्यांनी मुंबईत तळ ठोकून राहणे आणि याबाबत वेगवेगळ्या स्तरावरील लोकांशी चर्चा करणे गरजेचे होते. कारण कायद्याच्या दृष्टीने घटनेतील तरतुदीनुसार मराठा समाज हा आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्याने त्यांना आरक्षण मिळू शकत नाही. पण हे सत्य सांगण्याची सरकारमध्ये हिंमत नाही. म्हणून सरकार मराठा आरक्षणाला झुलवत ठेवते आहे. पण अशा गोष्टी फार दिवस झुलवत ठेवता येत नाहीत. कारण शेवटी हा एका मोठ्या समाज समूहाच्या भावनांचा प्रश्न आहे. जर त्या समाजाच्या भावनांचा प्रक्षोभ झाला तर काहीही घडू शकते. म्हणूनच बाकीची सगळी काम सोडा आणि मराठा आरक्षणाच्या मुद्यावर लक्ष द्या. त्यावर बारीक नजर ठेवा. मराठा आरक्षणाचे निमित्त करून काही समाजकंटक या महाराष्ट्रात दंगली घडवण्याचा प्रयत्न करीत आहेत. बीडमध्ये जाळपोळ करणारे कुठल्या पक्षाचे नव्हते, असं आता उघडकीस येत आहे. मग मराठा विरुद्ध ओबीसी यांच्या संघर्षात समाजकंटकांना हात धुवून घेण्याची संधी देणार आहात का? याचे उत्तर सत्तेत बसलेल्या फुटीरांच्या नेत्यांनी द्यावे. जर भाजपसोबत तुम्हाला सत्तेत राहायची एवढी हौस आहे, तर खुशाल रहा पण मराठा आरक्षणाचा मुद्दा केंद्राकडून सोडवून घ्या. कारण आरक्षणाची मर्यादा वाढवणे हे केंद्र सरकारच्या हातात आहे. राज्य सरकारने बिहारप्रमाणे जरी आरक्षणाची मर्यादा वाढवली, तरी ती सुप्रीम कोर्टात टिकणार नाही. आणि जे तामिळनाडूमध्ये झाले तेच महाराष्ट्रात होऊ शकते. त्यामुळे टाईमपास थांबवा आणि भाजपच्या भजनी लागलेल्या राष्ट्रवादी आणि शिवसेनेतील फुटीरांनी भाजपच्या केंद्रीय नेत्यांना गळ घालून, संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणाचा मुद्दा मांडायला लावावा. आणि आरक्षणाच्या टक्केवारीत वाढ करण्याचा कायदा करावा. जेणेकरून महाराष्ट्र सरकारला मराठ्यांना १६ टक्के आरक्षण देता येईल. अन्यथा कुठल्याही मार्गाने मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही. जरांगे पाटलांच्या सांगण्यावरून महाराष्ट्रातील मराठ्यांना ओबीसींचे प्रमाणपत्र दिले जात आहे. पण तो निव्वळ पोरखेळ आहे. कारण सरकारच्या या कृतीला आज ना उद्या सुप्रीम कोर्टात आव्हान दिले जाईल. आणि त्यानंतर सरकारने सत्यनारायणाच्या प्रसादाप्रमाणे वाटलेली कुणबी प्रमाणपत्रे रद्दीत जातील. त्यावेळी काय करणार? म्हणूनच भाजपवर जर फुटीरांचा एवढा विश्वास असेल, तर त्यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न भाजपकडून सोडवून घ्यावा आणि स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करावा. अन्यथा राष्ट्रवादी आणि सेनेतील फुटीरांना भाजपमध्ये जाण्याची नामुष्की येईल. आणि भाजपात गेले तरी तिथे त्यांची डाळ शिजणार नाही. कारण भाजपात सुद्धा पक्षीय राजकारण मोठ्या प्रमाणावर आहे. भाजपातील उच्च वर्णीय नेत्यांनी ज्या पद्धतीने पक्षातील पंकजा मुंडे, एकनाथ खडसे यांच्यासारख्या निष्ठावान नेत्यांचा गेम केला त्याच पद्धतीने बाहेरून आलेल्या नेत्यांचा गेम केला जाईल. दुसऱ्या पक्षातून भाजपात गेलेले असे कितीतरी नेते सध्या अडगळीत पडलेले आहेत. ज्यात हर्षवर्धन पाटील, बबनराव पाचपुते यांच्या सारख्या बड्या नेत्यांचा समावेश आहे. त्यामुळे शिंदे, अजितदादा यांचीही तीच गत होणार आहे हे त्यांनी लक्षात ठेवावे.

## केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेअंतर्गत उत्पन्नवाढीच्या योजनेसाठी अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**पालघर/प्रतिनिधी**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार जि. पालघर यांचे अधिनस्त असलेल्या जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या चार ही तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजने अंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांकरीता खालील प्रमाणे उत्पन्न वाढीच्या योजना राबविण्यात येणार असून, योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेण्याकरीता इच्छुक अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांकडून दिनांक २५/११/२०२३ पर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) अर्ज मागविण्यात येत आहे, अर्जाचा नमुना या कार्यालयामार्फत विनामुल्य उपलब्ध करून दिला जाईल.

**योजनेचे नाव व अर्जासोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्राचे छायांकित प्रत (स्वसाक्षांकित प्रती) :** अनुसुचित जमीतीच्या शेतकऱ्याने लागवड केलेल्या क्षेत्रास तारेचे कुंपण तयार करण्यासाठी उव्हढ व्दारे अर्थसहाय्य देणे. (२० आर. / अर्धा एकर) व अनुसुचित जमातीच्या शेतक-यांना भाजीपाला लागवडीसाठी रोपे, खते, औषधे साठी डीबीटी व्दारे अर्थसहाय्य देणे. (४० आर. / एक एकर) : जातीचा दाखला किंवा जात वैद्यता प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, दारिद्र रेषेखालील दाखला, उत्पन्न दाखला (गतवर्षाचा), आधार कार्ड, रेशन कार्ड, बैंक पासबुक, ग्रामसभेचा ठराव व ग्रामपंचायत नाहरकत दाखला, कलर फोटो, यापूर्वी योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र, स्वघोषणापत्र, जमिनीचा ७/१२ उतारा.

**अनुसुचित जमातीच्या बचतगटांना पत्रावळी मशिन खरेदी करण्यासाठी डीबीटीव्दारे अर्थसहाय्य देणे :** बचतगट नोंदणी प्रमाणपत्र, बचत गटाचे बँक खाते पासबुक, बचत गटाच्या नावाचे ग्रां. पं. ठराव व नाहरकत दाखला, लाभार्थ्यांचे फोटो रजिस्टर, बचतगटाची जागेबाबत स्वतःची अगर खाजगी जागा भाडेतत्वार घेतलेले संमतीपत्र. (लाभार्थ्यांचे जातीचे दाखले, आधार कार्ड, रहिवासी दाखले, यापुर्वी लाभ न घेतल्याचे हमीपत्र, स्वघोषणापत्र.

**अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांना लघु उद्योगाच्या व्यवसायासाठी मिनी घरघंटी व मिनी राईस मिल खरेदी करण्यासाठी डिबीटीच्या माध्यमातुन अर्थसहाय्य देणे :** जातीचा दाखला किंवा जात वैधता प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, दारिद्र रेषेखालील दाखला, उत्पन्न दाखला (गतवर्षाचा), आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, ग्रामसभेचा ठराव व ग्रामपंचायत नाहरकत दाखला, घरपट्टी व विजबील कलर फोटो, यापूर्वी योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र, स्वघोषणापत्र.

**अनुसुचित जमातीतील ज्या महिलांचे शिलाई मशिन प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे अशा महीलांना शिलाई मशिन खरेदी करणेसाठी अर्थसहाय्य देणे :** शिलाई मशिन प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र जातीचा दाखला किंवा जात वैधता प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, दारिद्र रेषेखालील दाखला, उत्पन्न दाखला (गतवर्षाचा), आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, ग्रामसभेचा ठराव व ग्रामपंचायत नाहरकत दाखला, कलर फोटो, यापूर्वी योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र, स्वघोषणापत्र.

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत विविध प्रशिक्षण केलेल्या घेतलेल्या आदिवासी युवक युवतींना व्यवसायासाठी डीबीटी व्दारे अर्थसहाय्य देणे :** आय.टी.आय. उतीर्ण, प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र, व्यवसायाचा प्रारुप आराखडा, जातीचा दाखला किंवा जात वैधता प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, दारिद्र रेषेखालील दाखला, उत्पन्न दाखला (गतवर्षाचा), आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, ग्रामसभेचा ठराव व ग्रामपंचायत नाहरकत दाखला, कलर फोटो, यापूर्वी योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र, स्वघोषणापत्र.

**अनुसुचित जमातीच्या बचतगटास कॅटरीन व्यवसायासाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी उव्हढ व्दारे अर्थ सहाय्य देणे :** बचतगट नोंदणी प्रमाणपत्र, बचत गटाचे बँक खाते पासबुक, बचत गटाच्या नावाचे ग्रां.पं. ठराव व नाहरकत दाखला, लाभार्थ्यांचे फोटो रजिस्टर, बचतगटाची जागेबाबत स्वत:ची अगर खाजगी जागा भाडेतत्वार घेतलेले संमतीपत्र. (लाभार्थ्यांचे जातीचे दाखले, आधार कार्ड, रहिवासी दाखले, यापुर्वी लाभ न घेतल्याचे हमीपत्र, स्वघोषणापत्र).

**अर्ज मिळण्याचे व जमा करण्याचे ठिकाण :** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार ता. जव्हार जि. पालघर

**टिप :** लाभार्थ्यांना व्यक्तिशः एकाच योजनेकरिता अर्ज दिला जाईल व एकाच योजनेकरिता अर्ज करता येईल. यापुर्वी लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी अर्ज करू नये. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २५/११/२०२३ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत राहील.

**महत्वाची सुचना :** लाभार्थ्यांनी या पुर्वी या कार्यालयात सादर केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येत असून इच्छुक लाभार्थ्यांनी नव्याने अर्ज करणे बंधनकारक आहे.

**लाभार्थी निवड निकष :** लाभार्थी निवड करतांना प्रथम आदिम जमातीचे लाभार्थी, दारिद्र रेषेखालील लाभार्थी, दिव्यांग (अपंग), विधवा, परितक्ता, निराधार महिला यांना प्राधान्याने योजनेचा लाभ देण्यात येईल. नंतर जसे अर्ज प्राप्त होतील त्यातील कमी उत्पानापासून ते जास्त उत्पन्नापर्यंत यादी तयार करुन त्यानुसार लाभ दिला जाईल. आवश्यक ती कागदपत्रे, अर्जाची जेष्ठता, उपलव्य निधी, प्राप्त लक्षांक व तालुकानिहाय निश्चित केलेला लक्षांक या निकषावर लाभार्थ्यांची निवड केली जाईल.

## नागपूर येथील कार्यशाळेत केंद्रात आणि राज्यात स्वतंत्र शेतकरी मंत्रालयाची पूर्तता व्हावी; शेतकरी-कष्टकरी महासंघाची मागणी




गेल्या ७५ वर्षात भारत देश स्वतंत्र होऊन सुद्धा शेतकरी विरोधी कायदे राबविल्या गेलीत. त्याचा परिणाम शेतकरी आत्महत्येत वाढला. चुकीचे आयात निर्यात धोरणे वापरून शेतकरी कर्जबाजारी केला आणि भांडवलदाराला रसद पुरविली. भांडवलदाराची कर्ज माफ करून शेतकरी मात्र ती देशोधडीला लावला. शेतकरी धोरणाचे उच्च विचाराचे लोकप्रतिनिधी विधान भवन संसद मध्ये पाठविल्याशिवाय ही व्यवस्था बदलणे शक्य नाही. रस्त्यावरील आंदोलने खूप झाली परंतु शेतकऱ्यांचे प्रश्न अधिकार न्याय त्यांना मिळाला नाही. आणि आजच्या शासन प्रणालीत ते मिळणे शक्य सुद्धा नाही. शेतीमालाचा भाव वाढवून द्या अशी मागणी करणारे आमदार खासदार राज्यात व केंद्रात नाहीत. हुजरे गिरी करणारे पक्षप्रतीनिधी पाठवून जनतेने स्वतःच्या पायावर धोंडा पाडून चघेतला.

राजकीय पक्षाचे प्रतिनिधी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवतील, मात्र त्यांनी हुजरेगिरीत आपले आयुष्य गमावले, स्वतः अब्ज्यो रुपयाच्या प्रॉपर्टी तयार करून व शेतकरी मात्र मारून टाकले. ही सर्व व्यवस्था बदलण्याची गरज तयार झाली. त्याकरिता वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्री गुरुदेव सेवाश्रम (आग्याराम देवी चौक, सुभाष रोड नागपूर येथे २० नोव्हेंबर २०२३ सोमवारला दुपारी १२ ते ५ पर्यंत) शेतकरी चर्चासत्र व कार्यशाळा शेतकरी- कष्टकरी महासंघाच्या वतीने घेण्यात आली.या चर्चासत्राचे धनंजय काकडे पाटील यांनी उदघाटन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन धनंजय पाटील काकडे यांनी केले. या चर्चासत्राला माजी खासदार प्रकाश भाऊ जाधव यांनी अध्यक्ष पद भूषविले. संबोधित करताना सरसेनापती काकडे पाटील म्हणाले - या देशात गरीबी हटविली नाही तर, गरिबावर राज्य करून, गरीबी वाढ वाढविणारी कायदे राबविले. जनतेला गुलामगिरी व लाचारी शिकविली. चुकीची शेतकरी धोरणे व कायदे वापरून शेतकऱ्या ला मारण्याचे कटकारस्थान रचले. या देशात लेबर कोर्ट, फॅमिली कोर्ट ,फौजदारी कोर्ट आहेत , तर या कृषीप्रधान भारत देशात शेतकऱ्यांना न्याय, हक्क व मिळवून देण्यासाठी अलग स्पेशल ग्रीकल्चर कोर्ट का झाले नाही? शेतीसंबंधीचे न्याय, निवाळे स्वतंत्ररित्या पार पडले असते. देशात न्याय व्यवस्था राहिली नाही खरे-खोटे निकाल एकाच तराजूत मोजल्या जात आहेत. म्हणूनच या देशात शेतकरी आत्महत्या थांबण्यासाठीस्वतंत्र शेतकरी मंत्रालयाचे पूर्तता करण्याची गरज निर्माण झाली आहे. शेतीच्या मोजमापासाठी भूमी अभिलेख झाले, वडिलोपार्जित नोंदीसाठी महसूल मंत्रालय झाले, शेतीच्या उत्पादनासाठी कृषी मंत्रालय झाले, परंतु शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांना अधिकार नाही व त्याच्या हालअपेष्टां, समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र शेतकरी मंत्रालय मात्र झाले नाही, हीच या देशातील फार मोठी शोकांतिका आहे? असे सरसेनापती धनंजय पाटील काकडे यांनी सांगितले. या चर्चासत्रात राष्ट्रसंतांची अर्पण पत्रिका वाचण्यात आली. या कार्यशाळेत अनेक प्रमुख वक्तेनी भाग घेऊन संबोधित केले, सर्वश्री कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाशभाऊ जाधव, रुपरावजी वाघ, अशोकराव यावले, बाळासाहेब उर्फ चंद्रकांत देशमुख रावेरीकर, सोमराज तेलखडे, डॉ.मंगेश देशमुख, एम. एन. खैरे, डॉ.रेखाताई निमजे, डॉ अरुण वऱ्हाडे, इतर अनेक प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली. या चर्चासत्रात बंडूभाऊ कापसे, साडेपाचशे कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित होते. शेवटी राष्ट्र वंदना होउन कार्यक्रम संपला.

## माजी विद्यार्थी स्नेंह मेळाव्यातून आठवणींना उजाळा



**लातूर/प्रतिनिधी**

अशा आशयाचे भाव पंधरा वर्षानंतर एकत्र भेटलेल्या यमुनाबाई गोरे अध्यापक विद्यालयाल मुरुड येथील २००५ ते २००८ या वर्षात शिकणार्या माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. तब्बल पंधरा वर्षा नंतर हे माजी विद्यार्थी एकमेकांना भेटले. आपल्या कॉंलेज जिवणातील अनेक कडु-गोड आठवणीला यावेळी त्यांनी उजाळा दिला. भाकरीचा चंद्र शोधण्यात आयुष्याला व्यापुन राहिलेल्या व्यस्त जिवणात सुध्दा प्रत्येकाच्या मनात आठवणींचा एक कप्पा असतो. तो आपल्याला एंकातांत हळुवार पणे, आठवणींचा मोरपीस फिरवत असतो. आणि यातुनच प्रत्येकाला आपल्या कॉंलेज जिवणातील आठवणी येत असतात. अशा निर्माण झालेल्या भावनेतुनच सामाजिक कार्यकर्ते अनिल पुरी यांच्या पुढाकारातून यमुनाबाई गोरे अध्यापक विद्यालयातील माजी विद्यार्थीचा स्नेंह मेळावा नुकताच मुरुड येथे आयोजित करण्यात आला होता. त्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी पंधरा वर्षापुर्वी प्रमानेच सकाळी दहा वाजता डिएड कॉंलेज भरले. मग प्रार्थना परीपाट झाले विद्यार्थी रांगेत वर्गात गेले. प्राध्यापकांनी हजेरी घेतले. आपण ज्या वर्गात शिकलो ज्या बाकड्यावर बसलो त्याच ठिकाणी बसुन या विद्यार्थीनी पंधरा वर्षा पुर्वीचे क्षण अनुभवले. आपल्याला शिकवलेल्या प्राध्यापकांचा सन्मान करुन सर्वच विद्यार्थीनी आपल्या भावना व्यक्त केल्या.पंधरा वर्षानंतरही मैत्रीतील गोडवा कायम होता. या वेळी प्राचार्य कैलास मोठा, प्रा.गिरीश रंदाळे, प्रा.महादेव बरुरे, प्रा.पंडीत महामुनी मॅडम, प्रा.निता समुद्रे मॅडम, प्रा.बजाज मॅडम प्रा.काळे मॅडम यांच्या सह सामाजिक कार्यकर्ते अनिल पुरी, सचिन लाटे.महेद्र मुरकुटे, वनिता ओनामे, अंजली लोहारकर, सिमा शिंदे, अमोल गोरे, महेश दांगट, रोहिणी नाडे, अमोल खोचरे, शितल विभूते, श्रीहरी गाढवे, राहुल शिन्दे, सारीका नरवडे, प्रकाश जाधव,शिला धावारे, अनिता सरवदे, सत्यभामा पाटील, मिरा अंबुरे. संजय भंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनिल पुरी यांनी केले तर आभार रोहिणी नाडे यांनी मांडले. धनेगाव जी.प.च्या मुख्यद्यापिका ज्योती स्वामी यांना शेगाव येथे राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रधान लातूर-लातूर तालुक्यातील धनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती मनोहर स्वामी यांना ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाच्या वतीने दिला जाणारा शेगाव येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मान्यवराच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ज्योती स्वामी या एक विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापिका असून धनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये त्यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत या उपक्रमाची दखल घेऊन सदर पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे. या वेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे माजी मंत्री संजय कुठे, नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर आडबले, पदवीधर आमदार अभिजीत वंजारी, तसेच राज्याध्यक्ष श्याम लेडे, राज्या उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, राज्य सरचिटणीस अनिल नाचपल्ले राज्य समन्वयक विजयकुमार पिनाटे, महिला जिल्हा अध्यक्ष रेखा सुडे, राष्ट्रीय ओबीसी महासंघ. लातूर हिरालाल पाटील आधीसह अनेक मान्यवर उपस्थित होते. धनेगाव येथील मुख्याध्यापिका ज्योती स्वामी यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अनेक स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# ‘मुंबई फेस्टिव्हल २०२४’ मध्ये सर्वांनी सहभागी व्हावे -गिरीश महाजन




**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबईतील पर्यटन स्थळे जागतिक नकाशावर पोहोचवण्यासाठी २० ते २८ जानेवारी दरम्यान मुंबई फेस्टिव्हल २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. स्वप्नाच्या प्रवेशद्वारात अर्थातच मुंबईत होणाऱ्या या फेस्टीव्हलमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी केले. सह्याद्री अतिथीगृह येथे पर्यटन विभाग आणि मुंबई फेस्टिव्हल समिती मार्फत २० ते २८ जानेवारी दरम्यान आयोजित होणाऱ्या मुंबई फेस्टिव्हल २०२४ कार्यक्रमाची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली त्यावेळी मंत्री श्री. महाजन बोलत होते. मुंबई फेस्टिवल सल्लागार समितीचे अध्यक्ष आनंद महिंद्रा, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी-शर्मा, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी, काळा घोडा महोत्सवाच्या आयोजक ब्रिंदा मिलेरा, प्रख्यात संगीतकार शमीर टंडन आदी उपस्थित होते. मंत्री श्री.महाजन म्हणाले की,नऊ दिवसीय महोत्सवामध्ये सर्वांना एकत्र आणण्यासाठी सांस्कृतिक महोत्सव, संगीत, नृत्य आणि सिनेमा इव्हेंट्स, फूड फेस्टिव्हल सादर केले जातील. हा उत्सव मुंबईकरांच्या भावना आणि शहराच्या समृद्ध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसावर प्रकाश टाकणारे अनुभव आणि उपक्रम एकत्र आणणारा आहे. पर्यटनाला चालना देणे, विकास आणि सर्वसमावेशकता जोपासणे आणि उद्योगात नवीन संधी आणि मार्ग शोधणे हे या महोत्सवाचे उद्दिष्ट आहे.'मुंबई फेस्टिव्हल २०२४' हा केवळ एक कार्यक्रम नाही; हा एक परिवर्तनकारी अनुभव आहे, जो भारताने पाहिलेल्या सर्वात मोठ्या वार्षिक उत्सवांपैकी एक आहे. म्युझिक फेस्ट, अर्थ मुव्ही कॉन्टेस्ट, बीच फेस्ट, मुंबई वॉक, टुरिझम कॉन्क्लेव्ह, सिनेमा फेस्ट, क्रिकेट क्लिनिक, महा शॉपिंग फेस्ट, महामुंबई एक्स्पो या उपक्रमांचा या फेस्टव्हिलमध्ये समावेश आहे, असेही ते म्हणाले. मुंबई फेस्टिव्हल सल्लागार समितीचे अध्यक्ष श्री. महिंद्रा म्हणाले की, मुंबई फेस्टिव्हलच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील स्टेक होल्डर्स एकत्र येत असून हा फेस्टिव्हल एक वेगळा अनुभव देणारा आहे. या फेस्टिव्हलमुळे मुंबईच्या संस्कृतीचे एकत्रित दर्शन होईल. शिवाय सर्व मुंबईकरांना एकत्र आणण्यात या फेस्टिव्हलचा खूप मोठा वाटा असेल. प्रत्येकजण आमंत्रित आहे,' ही फेस्टिव्हलची संकल्पना अत्यंत समर्पक आहे. मुंबईतील कला, संस्कृती, क्रीडा, फॅशन आणि बरेच काही एकत्र करून अनेक कार्यक्रमांद्वारे या अनोख्या उत्सवाचे साक्षीदार होता येणार आहे. हा फेस्टिव्हल केवळ एक कार्यक्रम नसून रसिकांसाठी हा अवर्णनीय आनंद असेल, असे महिंद्रा म्हणाले. पर्यटन संचालक डॉ. पाटील म्हणाले की, मुंबईत विविध ठिकाणी मुंबई फेस्टिव्हलचे कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. इव्हेंट लाइन-अपमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, व्हायब्रंट म्युझिक फेस्ट, महा मुंबई एक्स्पो, मनमोहक सिनेमा, बीच फेस्ट, मुव्ही स्पर्धा आणि रोमांचक क्रिकेट क्लिनिक, स्टार्ट-अप फेस्ट अशा विविध आणि आकर्षक उपक्रमांचा समावेश आहे. मुंबई वॉक हे मुंबई फेस्टिव्हलच्या वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्यांपैकी एक आहे. या वॉकद्वारे मुंबईचे गतिचक्र कायम ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या डबेवाला, पोलिस हवालदार, बेस्ट बस ड्रायव्हर आणि कंडक्टर तसेच सफाई कामगार, सफाई कर्मचारी आदी मुंबईवीरांचा सत्कार करण्यासाठी शहरातील आयकॉन्स एकत्र येतील.

राज्य शासनाने विझक्राफ्ट एंटरटेनमेंट एजन्सी प्रा. लि. कंपनीकडे मुंबई फेस्टिव्हलचे संकल्पना आणि व्यवस्थापनेची धुरा सोपवली आहे. मुंबई फेस्टिव्हलचे मुख्य आकर्षण म्हणजे शॉप एड विन फेस्टिव्हल. ज्यामध्ये एकाधिक रिटेल आणि डायनिंग आउटलेट्स तसेच मनोरंजनाच्या संधींचा समावेश असेल. यातील मेगा बक्षिसांमध्ये अनेकांची स्वप्ने सत्यात उतरतील. मुंबई मॅरेथॉन आणि काळा घोडा कला महोत्सव हे मुंबई महोत्सवाचे सहयोगी कार्यक्रम म्हणून भाग आहेत. मुंबई फेस्टिवल २०२४ च्या घोषणेनंतर मुंबई फेस्टिव्हलचा लोगो, सपनो का गेटवे' या थीमचे लोकार्पण करण्यात आले, यानंतर संगीतकार श्री. टंडन यांनी रचलेल्या संकल्प गीताचे देखील लोकार्पण केले गेले. गाण्यातून मुंबईची असीमित ऊर्जा आणि विविधतेत नटलेल्या एकतेचे दर्शन घडून येते. चित्रपट आणि नृत्य दिग्दर्शक रेमो डिसूझा यांनी मुंबई फेस्टिव्हलच्या गाण्याला हुक स्टेप्स सादर करून 'संकल्प गीताने' सादरीकरण केले.

### बांधकाम कामगारांचा दसरा कडू आणि दिवाळीही अंधारातच

# माध्यान्ह भोजन योजना बंद कामगार शिष्यवृत्तीच्या प्रतिक्षेत

### गेल्या सहा महिन्यांपासून लातूर जिल्ह्याचे कामकाज ठप्प




**देवणी/शकील मनियार**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाकडून बांधकाम मजूर कामगारांसाठी शासनाकडून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आणि आरोग्यदायी योजना राबविण्यात येतात, यावर शासनाकडून करोड़ों रुपये खर्च करण्यात येते कामगारांच्या मुलांसाठी शिक्षणासाठी दोन हजार ते एक लाख, घरकुल साठी दोन लाख, मुलीच्या लग्नासाठी ५१ हजार रुपये, कामगाराच्या स्वत च्या लग्नासाठी ३० हजार रुपये, आरोग्यासाठी १५ हजार ते १ लाख, आणि मृत्यु झाल्यास २ लाख ते ५ लाखापर्यंत शासनाकडून असे लाभ दिले जातात. परंतु लातूर जिल्ह्यातील कामगार गेल्या सहा महिन्यांपासून या सर्व लाभापासून वंचित राहिले असून त्यांच्या लाभाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी होताना दिसत नाही, कामगार आपल्या मुलांच्या शिष्यवृत्ती ची आतुरतेने वाट पाहत आहेत त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी गंभीर समस्या निर्माण झाली आहे, सहा महिने उलटूनही कोणतेच काम होताना दिसत नाही म्हणून कामगार आर्थिक अडचणीत सापडला आहे त्यांची अवस्था दयनीय झाली आहे, जून जुलै महिन्यात भरलेली शिष्यवृत्ती आतापर्यत मिळाली नाही.

शासनाकडून निधीची कसलीही कमतरता नसताना सुद्धा कर्मचारी व अधिकारी मात्र आपले कर्तव्य योग्य पद्धतीने बजावत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणाची ही धास्ती नाही आणि कामगारांचा लातूर जिल्ह्यात कोणीही वाली नाही कारण याकडे जनतेचे सेवक म्हणून मिरवणारे नेते किंवा संघटनेचे लक्ष नाही म्हणुनच कामगारांची पिळवणूक होत आहे नवीन नोंदणी करण्याचे काम सुद्धा ३ महिन्यापासून बंदच आहे, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दसरा दिवाळी मात्र जोरात आनंदाने साजरी केली परंतु कामगारांना मात्र दिवाळी दसरा अंधारातच साजरा करावा लागला त्यावर शासनाने माध्यान्ह भोजन योजना बंद केली आहे. आता तरी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव होईल का नाही हे मात्र येणारा काळच ठरवेल.

# युवा महोत्सव, आयोजनासाठी पूर्व तयारी आढावा बैठक संपन्न



**पालघर/प्रतिनिधी**

युवकांचा सर्वागिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढिस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. राज्यात सन २०२३-२४ या वर्षातील युवा महोत्सवाचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य व कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणार आहे. याविषयीची पूर्वतयारी आढाव बैठक निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली. यावेळी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर, जिल्हा क्रिडा अधिकारी सुहास व्हनमाने, तालुका क्रीडा अधिकारी भक्ती आंबरे, आदि उपस्थित होते. युवा महोत्सवाचे आयोजन जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर करुन राज्याचा प्रातिनिधिक चमु राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी पाठविण्यात येतो. केंद्र शासनाने राष्ट्रीय युवा महोत्सव २०२३-२४ आयोजना बाबत दि. २३ व २४ एप्रिल २०२३ रोजी इंफाळ व दि. २२/०९/२०२३ रोजी नवी दिल्ली येथे बैठकांचे आयोजन करण्यात आलेले होते, यामध्ये केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशा नुसार राज्यात युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२३ हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष घोषित केलेले असल्याने राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्र राज्यासाठी तृणधान्य उत्पन्न वाढीसाठी विज्ञानाचा वापर २. सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान ही संकल्पना दिलेली आहे. या संकल्पनेवर आधारीत जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय युवा महोत्सवात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडून हुतात्म्यांना अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०७ हुतात्म्यांना हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हुतात्मा चौक येथील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याचा सर्वांगीण विकास करण्याची संकल्पना मांडली. पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, २१ नोव्हेंबर हा महाराष्ट्रासाठी महत्वाचा दिवस असून या दिवशी केवळ अभिवादन, पुष्पचक्र अर्पण करून चालणार नाही. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील १०७ हुतात्म्यांच्या बलिदानाची आठवणीचा हा दिवस आहे. या दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण विकास करण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इकबाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर आदिंनीही पुष्पचक्र वाहून अभिवादन केले.



# वाढवण बंदराविषयी पालघर टेंभोडे येथे होणार जनसुनावणी!




**पालघर/प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरणाने वाढवण येथे ९ कंटेनर टर्मिनल्स, ४ बहुउद्देशीय धक्के, ४ लिक्विड धक्के, रो-रो धक्के, कोस्ट गार्ड धक्का आणि १०.१४ किमी ब्रेकपरॅटर, ड्रेझिंग आणि कंटेनर आणि कार्गो स्टोरेज क्षेत्र १४४८ हेक्टर जमीन इ. सह वार्षिक २९८ दशलक्ष टन क्षमतेच्या प्रस्तावित ग्रीनफिल्ड बंदराच्या विकासासाठी पर्यावरण मंजूरीसाठी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम, २००६ नुसार जनसुनावणी दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी, सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी (एस.डी.एस.एम.) कॉलेज, कॉलेज रोड, टेंभोडे, ता.जि.पालघर ४०१ ४०४ येथे पार पडणार आहे. सदर जनसुनावणीबाबत उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ, तारापूर-३ यांचेमार्फत दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी दैनिक लोकमत या मराठी वृत्तपत्रात व दैनिक The Free Press Journal या इंग्रजी वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रकल्प आराखड्याची माहिती असलेली पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची इंग्रजी मधील प्रत व कार्यकारी सारांशाची मराठी व इंग्रजी मधील प्रत जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असून, सदर दस्तऐवज अभ्यासवायचा असल्यास नागरिकांनी दालन क्र.११०, पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, कोळगाव, पालघर बोईसर रोड, ४०१ ४०४ येथे उपस्थित राहणेचे आवाहन जिल्हाधिकारी, पालघर यांनी केले आहे.

# विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याकडून गाळप ऊसाला २५०० रुपयांना पहिला हप्ता जाहीर

**लातूर/प्रतिनिधी**

शेतकरी सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी अविरतपणे सुरू असलेल्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याकडून चालू गळीत हंगाम २०२३-२०२४ साठी गाळपास आलेल्या ऊसाला कारखान्याकडून एफआरपी ऊस दरापोटी प्रति मे.टन रू.२५०० (दोन हजार पाचशे) प्रमाणे पहिला हप्ता जाहीर करण्यात आला असून संबंधित शेतक-यांच्या खात्यावर सदरील रक्कम जमा करण्यात आली आहे. कारखान्याचे चेअरमन तथा मांजरा परिवाराचे मार्गदर्शक माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब,माजी मंत्री कारखान्याचे सन्माननीय संचालक आ. अमित विलासरावजी देशमुख साहेब, लातूर ग्रामीणचे आ.धिरज विलासरावजी देशमुख साहेब यांच्या सुचनेनुसार २५००रू प्रमाणे पहिला हप्ता जाहीर करण्यात आला आहे.

यानुसार संबंधित शेतक-यांच्या खात्यावर बँकेमार्फत रक्कम पाठवण्यात आली आहे. चालू गळीत हंगाम हा प्रतिकुल परिस्थितीत देखील यशस्वी पणे पार पाडण्यासाठी कारखाना संचालक मंडळ व प्रशासन प्रयत्नशील आहे. गाळपाच्या १८ दिवसात कारखान्याने दि. २३/११/२०२३ पर्यंत ८७२१० मे.टन,ऊसाचे गाळप केले असून ४३१५०००(के.डब्लू एच)एवढी सहविज निर्मिती केली आहे तसेच १४०१५१लिटर एवढे इथेनॉल उत्पादीत केले आहे. कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस वेळेत गाळप व्हावा यासाठी नियोजनबद्ध गाळप सुरू असून आपला ऊस गाळपासाठी विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याकडे मोठ्या प्रमाणात द्यावा असे आवाहन करून दि२०/११/२०२३ पर्यंत ज्या ऊस उत्पादक शेतक-यांनी गाळपासाठी ऊस कारखान्याकडे दिला आहे.त्यांनी पहिला हप्त्याची रक्कम संबंधित बँक शाखेतून उचल करावी असे कारखान्याचे व्हा. चेअरमन श्रीशैल उटगे, सर्व संचालक व कार्यकारी संचालक पंडित देसाई यांनी आवाहन केले आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**निविदा सूचना क्रमांक-१०७ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या 'बी-१' नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील **सुशिक्षित बेरोजगार अभियंता** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. २४/११/२०२३ ते दि. ०८/१२/२०२३ सकाळी ११.०० ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०६ (सहा) कामे समाविष्ट आहे. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in, 2) https://paytopwd.gov.in

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष (जी.एस.टी. वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | सावरखंड स्मशानभुमी येथे विधीघाट तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ८,३१,९२४/- | आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम |
| २. | सावरे सासेपाडा जोडरस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ८,२१,६६४/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ३. | साखरे अंतर्गत रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | रु. ७,९९,३१६/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ४. | दहिसर ऑफिसपाडा मेन रस्ता ते गावदेवी मंदिरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. ता. पालघर, जि. पालघर | रु. ८,२०,३७९/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ५. | सावरे भिमरापाडा रस्ता तयार करणे. ता. पालघर, जि. पालघर | रु. ८,२१,६६४/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ६. | दुर्वेस सावरे मुख्य रस्ता ते दळविपाडा रस्ता तयार करणे. ता. पालघर, जि. पालघर | रु. ८,२२,११६/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २४/११/२०२३ ते दि. ०८/१२/२०२३ पर्यंत

ई-निविदा सादर करण्याचा दि. ११/१२/२०२३ सकाळी ११.०० वा. ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत.

ई-निविदा उघडणे दि. १४/१२/२०२३. दुपारी ११.०० नंतर शक्य झाल्यास.

**जा.क्र. सा.बां.वि/पालघर/निविदा/९३९५**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) ४०१ ४०४
दिनांक : १७/११/२०२३

सही/-
(स.प्र. पाटील)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**जिमाका/पालघर/जाहि १३२/५३२/२०२३ दि. २२/११/२०२३**

27 NOV TO 03 DEC 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 11/25/2023 9:13 PM Page 1



# घरफोडी आणि वाहन चोरीच्या गुन्ह्यांतील त्रिकुटास ४० लाखांच्या मुद्देमालासह अटक

भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी परिसरात वाढलेल्या वाहन चोरीच्या घटनांसह घरफोडी मोठ्या संख्येने वाढ झाली असताना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार भिवंडी गुन्हे शाखेने त्रिकुटास अटक करून त्यांच्या जवळून सुमारे ४० लाखांचा मुद्देमाल जप्त करीत दहा गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे. वाढत्या घरफोडी व वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिस आयुक्त यांनी सक्त निर्देश दिले होते. भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक स्थापन केले. या पथकातील पोलिस हवालदार अमोल देसाई यांना मिळालेल्या बातमीच्या आधारे शिवमंगल ईश्वरदिन मिश्रा उर्फ सागर, वय ४० वर्षे, शफातउल्लाह इस्तीयाक चौधरी उर्फ इरफान, वय ४५ वर्षे, दोघे रा.कल्याण रोड, टेमघर, भिवंडी, अमान फुरकान खान,वय ३० वर्षे, रा.मानपाडा दिवा रोड, बेतवडे गांव, ता. कल्याण यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडे पोलिसांनी कसून चौकशी केली असता त्यांनी नारपोली, कोनगांव व पडघा या पोलिस ठाणे हद्दीत केलेले घरफोडी, वाहन चोरी चे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या टोळक्या कडून नारपोली पोलिस ठाणे हद्दीतून चोरीस गेलेले १३ लाख किमतीचे तीन टेम्पो व इतर घरफोडीच्या गुन्ह्यातील असा एकूण ३९ लाख ४० हजार ८१३ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



# देसई-बेलवड रस्त्याच्या पूर्ततेसाठी आंदोलनाचा इशारा

वाडा/प्रतिनिधी

वाडा तालुक्यातील देसई-बेलवड या रस्त्यावर मागील वर्षी काही टप्प्यांची कामे पुर्ण केले आहेत मात्र केलेल्या कामांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले असून, ते खड्डे तातडीने भरण्यात यावेत त्याचबरोबर साईडपटटीचे काम अपुर्णावस्थेत असून ते देखील लवकरांत लवकर पुर्ण करण्यात यावे. या रस्त्यावर तीन टप्यांपैकी फक्त एका टप्याचे काम पुर्ण झाले असून, उर्वरित दोन टप्यांची कामे होणे अजुनही बाकी आहे. यामध्ये सोनाळे बु।। ते सोनाळे खु।। या टप्यावर संबंधित ठेकेदाराने केलेले काम हे अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झाले असून, सदर काम सुरू असतांना वाडा पुर्व विभाग संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी वारंवार तक्रारी करून देखील ते काम पुर्ण करून घेतले मात्र सद्यस्थितीत सदर सोनाळे बु।। ते सोनाळे खु।। हा रस्ता पुर्णतःहा खराब झाला आहे, तरी सोनाळे बु।। ते सोनाळे खु।। हया टप्याचे काम पुर्ववत् केल्याशिवाय संबंधित ठेकेदारास कुठल्याही प्रकारचे देयक अदा करण्यात येवू नये अन्यथा वाडा पूर्व विभाग संघर्ष समितीच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा वाडा तहसीलदार यांना देण्यात आला आहे. पावसाचा हंगाम सरून जवळपास दोन महिन्याचा कालावधी लोटला असून, संबंधित ठेकेदाराने उर्वरित दोन टप्प्यांचे काम अद्यापही सुरू केलेले नाही. तरी २५ नोव्हेंबर पर्यत सदर उर्वरित दोन टप्प्यांचे काम सुरू न केल्यास मंगळवारी २८ नोव्हेंबरला आपल्या कार्यालयात बेमुदत धरणे आंदोलन केले जाईल व त्यामुळे उद्भवणाऱ्या पस्थितीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.




पान १ वरून....

## मोतीराम सजा भोगून येताच शेषराव...

बऱ्हाणपूर डांबरी रोडपासून हाकेच्या अंतरावर गोरक्षनाथ नदीकडे जाणाऱ्या गाडरस्त्याजवळ गावातील बघ्यांची तोबा गर्दी दिसत होती. रस्त्यावरील येणारे-जाणारे वाहनधारक सुद्धा थांबून काय झाले ? याबाबत विचारणा करत होते. पोलिसांनी गाडी डांबरी रस्त्यावर उभी करून जमावाकडे कूच केली. पोलिसांना पाहताच गर्दी पांगली. काहींनी पंचनाम्यावर सही नको म्हणून काढता पाय घेतला. गाड रस्त्याच्या मधे मोतीराम धुळे यांचा मृतदेह पडलेला होता. मृतकाच्या गळ्यावर डाव्या बाजूने धारदार शस्त्राने खोलवर भोसकल्याच्या जखमा दिसत होत्या. जमिनीवर डोक्यापासून खाली रक्त वाहून गेले होते. डोळ्याला मुंग्या लागल्या होत्या. पोलिसांनी मृतदेह पाहताच ही हत्या असल्याचा कयास लावला. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा व इतर कायदेशीर सोपस्कर पूर्ण करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जळगाव (जा) रुग्णालयात पाठवला. पोलिसांनी घटनेबाबत उपस्थितांना विचारणा केली असता मृतकचा पुतण्या रविंद्र धुळे यांनी पोलिसांना माहिती दिली की मृतक त्यांचे काका असून रात्री त्यांना गावातील शेषराव दामधर याचे सोबत पाहिल्याचे काही लोकांनी सांगितले आहे. तसेच शेषरावच्या वडिलांचा २८ वर्षापूर्वी मृतकाने खून केला असल्याची महत्वपूर्ण माहिती पोलिसांना देऊन तशा आशयाची फिर्यादच पोस्टेला दाखल केली. जळगांव (जा) पोलिसांनी मोतीराम मारोती धुळे (रा. सुनगाव) यांचे प्रकरणी आरोपी शेषराव सखाराम दामधर वय खून ४५ रा. सुनगाव याचेवर गु.र.न. ६०९/२३ कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला. पोलिसानी तपासचक्रे वेगाने फिरवत काही तासात सुनगाव परिसरातील एका शेतातून संशयीत आरोपी शेषराव यास ताब्यात घेत जळगांव (जा) न्यायालयासमोर उभे केले. न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडीत पोलिसांनी त्याला घटनेबाबत विचारणा केली असता २८ वर्षापूर्वी मृतकने आरोपीच्या वडिलांचा खून केला होता. त्याचाच बदला शेषरावने घेतल्याचे समोर आले. जळगाव जामोद तालुक्यातील सातपुड्याच्या कुशीत असलेलं सुनगाव, या गावात मोतीराम मारोती धुळे हे कुटुंबासह राहत होते. मोतीराम यांना दारूचा भारी नाद, तरुण वयात त्यांना दारूची चटक लागली, दारूत बेभान होऊन भांडणे करणाऱ्या मोतीरामचे वय अवघे २४ वर्ष असतांना दारूच्या नशेत गावातीलच सखाराम दामधर यांच्या डोक्यात १९९५ मधील एके संध्याकाळी दगड घातला. दगडाचा घाव वर्मी लागल्याने घटनास्थळीच दामधर यांचा मृत्यू झाला. खुनाच्या आरोपात मोतीराम कोठडीत गेला. खून प्रकरणी दोषी ठरवत न्यायालयाने मोतीरामला सजा सुद्धा सुनावली. सन २००२ मध्ये सजा भोगून मोतीराम गावात परतला. पण त्याचा संसार उद्धुस्त झाला होता. लग्न होऊन काहीच दिवस झाले असतांना त्याच्या हातून खून झाल्याने मोतीरामची पत्नी त्याला सोडून गेली होती. दुसरे लग्न करावे तर त्याला मुलगी देणार कोण? म्हणून त्याने एकटा राहण्याचा निर्णय घेतला. गावातील घरात मोतीराम रहात होता आणि जेवण त्याच्या मोठ्या भावाकडे करत होता. दारूच्या नशेत त्याचे हातून खून झाला होता. संसाराची वाताहत झाली. त्याला जेलवारी करावी लागली तरीही मोतीरामची दारू सुटत नव्हती. मोतीराम धुळे याने खून केलेल्या सखाराम दामधरचा विवाहित मुलगा शेषराव काही वर्षानी मोतीरामसोबत बोलू लागला. बापाचा खून करून पितृछत्र मोतीरामने हिरावल्याची आठवण शेषरावला असली तरी झाले गेले सर्व विसरून शेषराव व मोतीराम दोघेही सोबतच दारू पीत होते. मोतीराम त्याला नेहमी दारू पिण्यास पैसे मागायचा, शेषराव सुद्धा त्याला पैसे देत होता. मोतीराम व शेषराव दोघेही 'हेवी ड्रिंकर' होते मजुरी करून कुटुंबाचा भार वाहणारा शेषराव दारूमुळे कामधंदा करत नसल्याने त्याच्या दारूड्या स्वभावास कंटाळून त्याची पत्नी ६ महिन्यापूर्वी त्याला सोडून माहेरी गेली होती. बायको माहेरी गेल्याने शेषराव मानसिक तणावात असायचा. तणावात व्यक्तीला चांगल्या प्रसंगाऐवजी वाईटच प्रसंग आठवतात असे म्हणतात. त्याचप्रमाणे तणावात शेषरावला त्याच्या आयुष्याची अलिखित डायरी आठवायची. त्यातील वयाच्या १७ व्या वर्षी पितृछत्र हरवल्याचे पान आठवल्यावर बापाचा खून करणारा मोतीराम खलनायक म्हणून दिसायचा. बापाचा मोतीरामने खून केल्याचे दारूच्या नशेत आठवल्यावर त्यांच्यातील खुनशी पूत्र जागा व्हायचा. दारू उतरल्यावर मात्र तोच सर्व काही विसरायचा. मोतीराम व शेषराव यांनी सोबत दारू घेतल्यावर काही कारणास्तव दोघांमध्ये चकमक झाली किंवा शेषरावने पैसे देण्यास नकार दिल्यास मोतीराम त्याला 'तुझ्या बापा प्रमाणे तुलाही संपवतो' असे धमकी वजा आव्हान देत होता. त्यामुळे शेषराव मधील खुनशी पूत्र जागा होऊन त्याच्यात बदल्याची तीव्र भावना जागृत झाली. ९ नोव्हेंबर रोजी वसुबारसचे दिवशी संध्याकाळी मोतीराम धुळे यांनी शेषराव यास दारू पिण्यास पैसे मागितले. अगोदरच मानसिक तणावात असलेल्या शेषरावच्या मनाचा ठाव बदलल्याने आज मोतीरामचा नेहमीचा खेळ संपवायचा विचार शेषरावने केला होता. मोतीरामने दारू पिण्यास पैसे मागितल्यावर घरून आणतो असे म्हणून शेषराव घरी गेला व घरून पैशासोबतच धारदार कट्यार कंबरेत खोचून घेऊन आला. २ क्वार्टरचे पैसे देऊन मोतीरामला दारू सांगितली. गावातून दारू आणल्यावर बऱ्हाणपूर रस्त्यावरील पाण्याच्या वॉलजवळ दोघांनी सोबत दारू घेतली. दारू चढल्यावर मग दोघांची तू, तू, मै, मै सुरू झाली. आता मला दारूसाठी पैसे मागायचे नाहीत असे शेषराव मोतीराम यास दरडावत म्हणाला. त्यावर मोतीराम चिडून 'तू मला पैसे दिले नाहीत तर तुझ्या बापासारखाच तुला संपवून टाकीन' असे म्हणताच शेषरावचा क्रोध अनावर झाला. त्याने मोतीरामला मारत काही अंतरावर गोरक्षनाथ नदीकडे जाणाऱ्या गाड रस्त्यावर आणून कंबरेत खोचलेल्या कट्यारने मद्यधुंद मोतीरामच्या मानेवर दोन वार केले. काही क्षणात वृद्धत्वाकडे झुकलेला मोतीराम रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर पडला. बापाच्या खुनाचा बदला घेऊन विजयी मुद्रेत अंधारात शेषरावने तेथून काढता पाय घेतला. दारूत अविचार करीत बापाच्या खुन्यास संपवून शेषराव न्यायालयीन कोठडीत आहे. तर दारुतच हातून झालेल्या खुनाची सजा भोगूनही न सुधरलेला मोतीराम दारुतच संपला. या प्रकरणाचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी डी. एम. गवळी यांचे मार्गदर्शनात जळगाव (जा) पो. स्टे. ठाणेदार दिनेश झांबरे, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत दोडके करत आहेत.

## मित्राच्या बायकोच्या नादी लागून...

त्याच्या दुकानाशेजारी त्याचा मित्र सुनिल चौगुले याचे हॉटेल आणि किराना मालाचे दुकान आहे. दोघांची ही दुकाने शेजारी शेजारी असल्याने त्या दोघांची घनिष्ट मैत्री होती. दोघे ही चांगले मित्र असल्याने दोघांचे ही एकमेकांच्या घरी येणे जाणे होते. यातूनच संभाजी शिंदे याची सुनिलची बायको कल्पना (काल्पनिक नांव) हिच्याबरोबर चांगली ओळख झाली. कल्पना ही दिसायला देखणी आणि चालू असल्याने ती ही त्याचेबरोबर मनमोकळेपणाने हसत खेळत बोलत असायची. संभाजीच्या मनात कल्पना बसली असल्याने तो तिच्याशी जवळीक साधत सलगी वाढवत होता. तिच्याशी बोलता यावे, तिला भेटता यावे म्हणून संभाजीने सुनिल बरोबर एकत्रीत व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. दोघांना ही शेतीची आवड असल्याने त्यांनी सांगोल्याकडे भागीदारीत शेती विकत घेण्याचा निर्णय घेतला. कालांतराने त्या दोघांनी ही सांगोल्याजवळ शेती विकत घेतली. ती शेती विकत घेत असताना सुनिल चौगुलेकडे पैसे कमी होते. नेमके याच संधीचा फायदा घेत संभाजीने सुनिलला शेती विकत घेण्यासाठी पाच लाख रूपयाची मदत केली. त्याने शेती विकत घेण्यासाठी पैशाची मदत केली असल्याने तो आता कधी ही सुनिलच्या घरी येत जात होता. कल्पनाला चोरून तो भेटत होता. तिच्याशी सलगी वाढवित मला तु त्या कामासाठी पाहिजे आहेस, तुला राणी सारखे ठेवीन असे आश्वासन देत त्याने तिला आपल्या अंगाखाली घेतले. त्यावेळेपासून त्या दोघांचे संबंध सुरू झाले. ती ही घरी नवरा सुनिल नसताना त्याला फोन करू लागली.त्या दोघांचे संबंध वाढीस लागल्यावर त्या संबंधाची चर्चा ही लगंरपेठ गावात होऊ लागली. तशी ही चर्चा सुनिलच्या कानावर आली. आपल्या पत्नीला संभाजीने नादाला लावले आहे. त्याने आपला जवळचा मित्र म्हणून आपला घात केला आहे याची सल त्याला लागली होती. या कारणातून सुनिलचे आणि त्याच्या पत्नीचे वारंवार भांडणे होत होती. तो तिला दारू पिऊन मारहाण करीत संभाजीचा नाद सोड म्हणून सांगत होता. त्याच्या मारहाणीला कंटाळून ती ही संभाजीला टाळू लागली होती. हल्ली ती त्याला भेटायला ही बोलावत नव्हती. आपण पैशाच्या आडून सुनिलच्या बायकोबरोबर संबंध ठेवले आहे हे संभाजीला ही चांगले माहित होते. हल्ली ती भेटायला बोलावत नसल्याने संभाजीने वेगळाच विचार केला. तो सुनिल याला आपण दिलेले पैसे परत मागू लागला. त्याने दिलेली रक्कम मोठी असल्याने सुनिलला ती रक्कम परत करणे ही शक्य नव्हते. त्या दोघांनी जरी भागिदारीत सांगोल्याजवळ शेती घेतली असली तरी ती भागिदारी आता संभाजीला नको होती. त्यासाठी तो वेगळे खोडवे सुनिलला लावत होता. सुनिलकडे पैशाचा तगादा त्याने लावला. वेगवेगळी कारणे सांगून सुनिलला तो त्रास देवू लागला. त्या दोघांची मैत्री आहे, त्या दोघांनी ही भागिदारीत शेतीचा व्यवसाय सुरू केला आहे. त्यातून संभाजी काय करीत आहे हे सुनिलला माहित होते. त्याचा हात दगडाखाली अडकला होता. त्याला काय करावे काय नको असे झाले होते. संभाजी तर दर चार पाच दिवसांनी पैसे मागायला येत होता. कधी कधी तो घरी नसताना पैसे मागण्याच्या उद्देशाने तो त्याच्या घरी जात होता. त्यावेळी कल्पनाने ही त्याला आम्ही तुम्हाला पैसे परत देतो पण त्यांना त्रास देवू नका असे सांगितले होते. पण तो ही आडवाटेने मी पैशासाठी थांबतो पण मला तु हवी आहेस माझ्याबरोबर संबंध ठेव असे सांगत होता.तिला ही काय करावे आणि काय नको असे झाले होते. संभाजीची नको ती अट ऐकून तिला ही धक्का बसला. इकडे आड तिकडे विहिर अशी तिची गत झाली. सुरूवातीलाच आपण चुकले आहे आता काय उपयोग होणार नाही हे तिला ही माहित होते. तरी ही तिने त्याला आपण संबंध ठेवणार नाही हे स्पष्टच सांगितले. यातून ही संभाजीने दुसराच मार्ग काढला.हल्ली तो सुनिल याला एक तर माझे पैसे दे नाही तर ती जमीन माझ्या नावावर कर असा तगादा लावला होता.जर सुनिल याने ती जमीन त्याच्या नावावर केली तर जमीन विकत घेतेवेळी घातलेली रक्कम बुडणार होते. संभाजीबरोबर व्यवहार करून दोन्ही कडून ही सुनिल हा कात्रीत सापडला होता. त्यातच त्याच्या बायकोबरोबर असलेल्या संभाजीची चर्चा ही गावात होऊ लागल्याने त्याची बदनामी होत होती. यातून कायमचा मार्ग काढयाचा असा त्याने विचार केला. संभाजीला आपल्या व्हॉटॲपवर आणि इन्स्टाग्रमावर वेगवेगळे स्टेटस ठेवण्याचा नाद होता.त्यातच त्याने १४ नोव्हेंबर रोजी आपल्या इन्स्टाग्रमावर सावधान, क्योंकी धोका वही लोग देते है, जो आपने सबसे करीब होते है! असा सदेश ठेवला होता. त्याच्या या पोस्टला गावातील अनेकांनी लाईक ही केले होते. हा संदेश त्याने सुनिलला डिवचण्यासाठी ठेवला आहे आणि यातून त्याला काय सुचवायचे आहे हे अनेकांनी ओळखले होते. त्याचा हा मेसेज सुनिल याने ही वाचला होता. हा मेसेज त्याने आपल्या बायकोला उद्देशून ठेवला आहे हे सुनिल याने ओळखले होते. तो मनातून खचला. कारण गावभर आधीच त्याच्या बायकोच्या आणि संभाजीच्या विवाहबाहय संबंधाची चर्चा होत होती. आता गप्प बसायचे नाही असा विचार करून सुनिल याने मंगळवार दि.१४ नोव्हेंबर रोजी रात्री दुकान बंद करून जाताना संभाजीला त्याच्या मोबाईलवर फोन केला. नुकताच दिवाळीचा सण झाला असल्याने संभाजीने त्या दिवशी रात्री लवकरच आपले दुकान बंद करून घराकडे गेला.घरात गेल्या गेल्या त्याला सुनिलचा बाहेर जेवायला येणार का? असा फोन आल्यावर तो लगेच घरातून बाहेर गेला. तो सरळ सुनिलच्या हॉटेलकडे आला. त्याने ही आपले हॉटेल बंद केले. यावेळी सुनिलच्या मनात वेगळे काय चालू आहे याचा अंदाज संभाजीला आला नाही. तो सरळ सुनिलच्या गाडीवर बसला. ते दोघे ही लगंरपेठ बाहेरील कवठेमहंकाळला धाब्यावर जेवायला येत होते. रात्रीचे ९ वाजून गेले होते. ते दोघे ही गाडीवरून लंगरपेठ पासून दोन किमी अंतरावर असणाऱ्या ओढयाजवळ आले.तेथे लघुशंकेच्या निमित्याने गाडी थांबवली. संभाजी हा लघुशंका करीत असताना सुनिल याने आपल्या खिशातून खर्डाची चटणी काढली आणि ती चटणी संभाजीच्या डोळ्यात फेकली. यावेळी काय घडणार आहे हे संभाजीने ओळखून तेथून घराच्या दिशेने ओरडत पळू लागला.त्याचा पाठलाग सुनिलने केला. त्याला काही अंतरावर गाठून खाली पाडले. त्याच्या डोक्यावर, मानेवर आणि चेहऱ्यावर त्याने आपल्याकडील कुऱ्हाडीने वार केले. संभाजी हा रक्ताच्या थारोळ्यात पडला. तरी ही सुनिलचा राग शांत झाला नाही तळमळत असणाऱ्या संभाजीच्या पोटावर त्याने आपल्याकडील चाकूने सपासप वार केले. त्या सरशी संभाजी हा जागीच निपचिप पडला. त्याचा जागीच मृत्यू झाल्याचे बघून सुनिलने त्याचा मृतदेह तसाच रस्त्याने ओढत ओढयापात्रात नेला. ओढयापात्रात पाणी नसल्याने त्याचा मृतदेह तसाच तेथे टाकून सुनिल हा आपल्या गाडीवरून घरी गेला. घरी गेल्यावर हात पाय धुवून जेवण करून तो परत संभाजीच्या घराकडे गेला. तेथे त्याने संभाजीचा चुलत भावाला सांगितले की, गावाच्या बाहेर असणाऱ्या ओढयाजवळ त्याचेवर आणि संभाजीवर अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला असून त्यात संभाजीचा मृत्यू झाला आहे. त्यावेळी सुनिल याने संभाजीच्या चुलत भावाला ओढयाकडे आणून ओढया पात्रातील त्याचा मृतदेह दाखविला. मयत संभाजीच्या भावाला वेगळी शंका आली. त्याने या घटनेची माहिती आपल्या इतर नातेवाईकांना देऊन घटनास्थळी बोलावून घेतले. या घटनेची माहिती त्यांनी कवठेमहंकाळ पोलीसांना दिल्यावर घटनास्थळी पोलीस ही तातडीने दाखल झाले. घटनास्थळी मातीत आणि दगडात संभाजीचा मृतदेह पडला होता. चेहऱ्यावर, मानेवर डोक्यावर आणि पोटात धारदार शस्त्राने वार केल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला असल्याचे पोलीसाच्या लक्षात आले. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल सांळुखे यांनी भेट देऊन तपासाच्या पोलिसांना योग्य त्या सुचना दिल्या. पोलीस निरी. जोतीराम पाटील यांनी या घटनेची माहिती घेऊन तपासाला सुरूवात केली. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी कवठेमहंकाळ येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती मयत संभाजी शिंदे याचा मित्र सुनिल चौगले याला होती. त्यानेच संभाजीच्या चुलत भावाला या घटनेची माहिती दिली असल्याने पोलीसांचा त्याचेवर संशय होता. कारण तो घटनेपासून गावात नव्हता. तो गाव सोडून फरार झाला होता. पोलीस त्याचा शोध घेत असताना दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सुमारास तो कवठेमहंकाळ येथे पोलीसांना सापडला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता तो पोलिसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. आर्थिक व्यवहरातून त्याने संभाजीचा खून केला असावा असे पोलीसांना वाटत होते परंतु मयत संभाजी शिंदे याचे त्याच्या बायकोबरोबर असणाऱ्या विवाहबाहय संबंधातून त्याने त्याचा खून केल्याचे पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर मयत संभाजीच्या चुलत भावाकडून या घटनेची फिर्याद पोलीसांनी घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार संभाजी जगन्नाथ शिंदे (वय ३३) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी सुनिल वंसत चौगले (वय ३२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला कवठेमहंकाळ येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली दुचाकी गाडी, कुऱ्हाड आणि चाकू जप्त केले. या घटनेचा पुढील तपास पो.निरी. जोतीराम पाटील याच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी सागर गोडे, पो.उप.निरी. विनायक मसले, जगन्नाथ पवार, पांडूरंग वाघमोडे, मनोज पाटील, रामचंद्र खोत, राजु मानावर, परशुराम स्वामी यांनी केला. मित्राची मैत्री ही खरे तर उबंरयाच्या बाहेर असावी असे म्हणतात त्यात काही चुक नाही. नाही तर मित्राच्या बायकोवर वाईट नजर ठेवून तिच्याशी सलगी वाढवित संबंध ठेवणारे हे काही कमी नाहीत संभाजीने ही तिच चुक केली आणि वरून चेतावणारी स्टेटस ठेवीत आपणच बरोबर असल्याचे तो दाखवित होता. परंतु सत्य कधी लपत नाही तसेच त्याचे झाले आणि त्यातून अशा प्रकारची घटना घडली असे म्हणावे लागेल एवढे मात्र निश्चित.

## अज्ञात मारेकऱ्याचा प्लान यशस्वी...

खाजगी वाहनावर चालक असून घराची परिस्थिती बेताचीच असल्याने तिची आईदेखील घरकाम करते. संध्याकाळी देखील निकीताची आई घरकामानिमित्ताने बाहेर गेली होती. यावेळी निकिता घरात एकटी असल्याची संधी साधत अज्ञाताने घरात शिरून तिचा गळा चिरत तिची हत्या केली आहे. घटनेची माहिती कळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह देवपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. यावेळी घटनास्थळावर पंचनामा करत हत्या करण्यासाठी वापरलेल्या चाकूसह इतर पुरावे पोलिसांच्या फॉरेन्सिक टीमने जप्त केले. दरम्यान, निकिताच्या मारेकरीला शोधण्यासाठी पोलिसांनी दोन पथक तयार केली असून पोलीस मारेकऱ्यांचा शोध घेत आहे. दरम्यान निकिताची हत्या कोणी व का केली हे अद्याप स्पष्ट झालं नसून याप्रकरणी पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यामध्ये रात्री उशिरा खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संध्याकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास विघ्नहर्ता हॉस्पिटलच्या मागे निकीता कल्याण पाटील या २१ वर्षीय तरुणीची हत्या झाल्याची माहिती मिळाली होती. घटनेची माहिती मिळताच अधिकाऱ्यांसह पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. प्रथमदर्शनी तीक्ष्ण चाकूने गळा कापण्यात आला आहे. तसेच पोटात देखील खोलवर वार करण्यात आलं आहे. तीक्ष्ण हत्यारामुळे मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होऊन तरुणीचा मृत्यू झाला आहे. तपासासाठी तीन पथके तयार करण्यात आली असून काही संशयितांची नावे आमच्याकडे असून त्यानुसार तपास सुरु आहे. आरोपी हा मयत तरुणीच्या जवळच्या संबंधातील असावा असे घटनास्थळावरुन वाटत आहे, अशी माहिती विभागीय पोलीस उपअधीक्षक सचिन हिरे यांनी दिली.

# लातूर येथे कार अपघातात दुचाकीवरील एकजण ठार

लातूर/प्रतिनिधी

शहरातील राजीव गांधी चौकाजवळील गुरू माऊली हॉस्पिटल समोर राजीव गांधी चौकाकडून महात्मा बसवेश्वर चौकाकडे जाणार्या दुचाकीस बसवेश्वर चौकाकडून विरोधी बाजुने येणार्या कार चालकाने आपले वाहन हायगायी व निष्काळजीपणाने चालवून झालेल्या अपघातात दुचाकीवरील एकजण जागीच ठार झाला तर अन्य दोघेजण जखमी झाले असल्याची घटना २१ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडली.

शहरातील राजीव गांधी चौक ते बसवेश्वर चौकाकडे जाणार्या रस्त्यावर गुरू माऊली हॉस्पिटल समोर एमएच २४ ए.क्यु.१९१५ या दुचाकीवर बसून एलआयसी कॉलणी येथील रूमकडे जाणार्या तिघांना गाडी क्र.एमएच २४ बी.एल.७६६६ या महिंद्रा एक्सयुव्ही ३०० कारच्या चालकाने मद्यप्राशन करून आपल्या ताब्यातील वाहन हायगई व निष्काळजीपणे चालवून झालेल्या अपघातात हॉटेल मॅनेजर दीपक अंकुश कांबळे (वय ३५) रा.चिंचोली जोगन ता.औसा जि.लातूर हा जागीच ठार झाला तर रवीराज नितीन पाटील (वय २२ वर्ष), निलेश कांबळे (वय २१ वर्ष) रा.एल.आय.सी. कॉलणी, लातूर हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना पुढील उपचारासाठी जवळील गुरू माऊली हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलेले आहे. याप्रकरणी शैलेंद्र मोहन कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कार चालकाविरोधात कलम ३०४ अ, २७९, ३३७, ३३८, १८४ भादंवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस इन्स्पेक्टर विशाल शिंदे हे करीत आहेत.

# देवणी खुर्द येथे बालविवाह कायद्याची कडक अंमलबजावणी करणार-नरवटे केशव

## देवणी तालुक्यात बालविवाह मुक्त अभियानाला सुरुवात




**देवणी/प्रतिनिधी**

ग्रामीण महिला विकास संस्था देवणी व यूरोपीयन युनियन आणि स्वीसएड पुणे यांच्या वतीने देवणी तालुक्यातील वीस गावातून बालविवाह मुक्त अभियाला सुरुवात करण्यात आली. अभियानाच्या माध्यमातून देवणी खुर्द येथे दि, २२/११/२०२३ रोजी बुधवारी महिला, पुरुष, युवक, युवती, गटातील महिला रली व सभेत मोठा प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम देवणी खू ग्रामपंचायत कार्यालया समोर घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच यशवंत कांबळे, प्रमुख राजाराम पाटील, नरवटे केशव, अनिल कांबळे, रतन गरड, संजय गरड, माधव रणदिवे, छान मुराळे, ज्योतिबा पाटील, दैवशाला कांबळे, सोनाली रणदिवे, सरोजा गायकवाड, सत्यकला रणदिवे, शोभा रणदिवे, प्रभू काकनाळे, विजयकुमार पाटील, श्रीशांत माकने, तुकाराम हान्डे, लक्ष्मण रणदिवे, हनमंत मेह्त्रे, भरत गिरी, प्रकाश मेह्त्रे, ग्रामीण महिला विकास संस्थेच्या अध्यक्षा कुशावर्ता बेळे, गिरीश सबनीस, कचराताई गायकवाड, नागनाथ सुर्यवंशी, विकास बिरादार, सरोजा शिंदे, सत्यशिला सरवदे, कृष्णा इंगोले, विजयश्री बोचरे, प्रेरणा जाधव, सुखवास इसाळे, कला पथक सुधाकर गायकवाड, विष्णुकांता गायकवाड, मेघा बिरादार, प्रेरक लक्ष्मण रणदिवे, प्रेरिका मनिषा बिरादार, मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामसेवक गावातील सरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी ताई, आशा ताई, ग्राम पंचायत सदस्य उपस्थित होते.यात भिंती लेखन, पोस्टर प्रदर्शन, जाहीर मेळावे, कॉर्नर बैठका, युवकांसाठी सेल्फी पॉईंट, जनजागृती रथ, रॅली, ग्रहभेटी, गायन पथनाट्य यांच्या माध्यमातून बालविवाह मुक्त गाव करण्यासाठी बालविवाहाची कारणे, उपाय, परिणाम, कायदे याविषयी जनजागृती करण्यात आली. अभियानाची सुरुवात करण्या अगोदर ग्राम बाल संरक्षण समितीची बैठक घेऊन यावेळी बाल विवाह रोखण्याच्या संदर्भात त्यांचा भूमिका, जबाबदाऱ्या याविषयी चर्चा करण्यात आली यात तालुक्यातील प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# आपलं ज्ञानरुपी नाणं खणखणीत असावं -डॉ.गणपतराव मोरे



**लातूर/प्रतिनिधी**

ज्ञान हे शिक्षकांचे भांडवल असते. ते वाचनातून मिळते. वाचन हा आपल्या जीवनाचा भाग व्हावा. आपलं ज्ञानरुपी नाणं खणखणीत असल्यास सुसंस्कृत समाज निर्मिती होते, असे प्रतिपादन लातूरचे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे यांनी केले. नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत येथील राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयातील एम. ए. शिक्षणशास्त्र (एम.ए.एज्युकेशन) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे उद्बोधन व संपर्क सत्राचे गुरुवारी डॉ. मोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्रा. प्रदीप करंजीकर, केंद्र प्रमुख प्राचार्य जी. आर. मुंडे, केंद्र संयोजक प्रा. स्वाती केंद्रे यांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी डॉ. मोरे म्हणाले, मी प्राथमिक शाळेत शिक्षक असताना पीएच.डी. करीत होतो. प्राथमिकच्या शिक्षकाला पीएच.डी. करण्याची काय गरज आहे, असे अनेकजण म्हणाले. पण मी अत्युच्च ज्ञान आत्मसात करण्याचे ध्येय ठेवत पीएच.डी. पूर्ण केली. यानंतर वाचनात सातत्य ठेवत परीक्षांना सामोरे जात आज इथपर्यंत पोहोचलो आहे. कोण काय म्हणतंय याकडे लक्ष न देता पुढे चालावे. चांगल्या विचारांचा प्रचार झाल्यास समाजाचे भले होते, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाच्या संस्कृती पवार हिने मागच्या वर्षी 'नीट' परीक्षेत ७२० पैकी ६९० गुण घेतले आहेत. या संकुलाचा दरवर्षी शंभर टक्के निकाल लागतो. एम. ए. शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी हे मुख्याध्यापक व शिक्षक हे अनुभवी आहेत. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांना २४ वर्षांची वेतनश्रेणी मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात प्रा. स्वाती केंद्रे यांनी, एम. ए. शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम व निकाल याबद्दल माहिती नमूद केली. सूत्रसंचालन सी. एस. मोटे यांनी केले तर आभार प्रा. व्ही. डी. लोहारे यांनी मानले.

# देवणी वलांडी येथे हजरत टिपू सुलतान यांची जयंती साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहर व वलांडी येथे हजरत टिपू सुलतान यांच्या २७३ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम राबविण्यात आले. प्रारंभी महम्मद रफी सौदागर यांच्या हस्ते टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी ३६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. मिरवणुकीची सुरुवात माजी आमदार धर्माजी सोनकवडे व वाहेदसहाब बौडीवाले यांच्या हस्ते फित कापून करण्यात आली. मिरवणूक शेख शहाबोद्दीन सरवरदीया दर्गा येथून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सय्यद इरादतुल्लाशा कादरी दर्गा परिसरात पोहचली. माजी सरपंच राम भंडारे, उपसरपंच मेहमूद सौदागर, दिनेश पाटील, बालाजी सोंनकवडे मुस्ताक कादरी, नवनाथ सोंनकवडे, अयुब सौदागर, अरुण पाटील, शालेय समिती अध्यक्ष गणेश चवाळे, मूकेश कांबळे, सूशात साबने, यांच्यासह आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती समीती अध्यक्ष ताज मूंजेवार, उपाध्यक्ष मिनाज सय्यद, उपाध्यक्ष गौस मूंजेवार, हजरत टिपु सूल्तान विचार मंच अध्यक्ष अक्रम शेख, उपाध्यक्ष हमीद तांबोळी, कार्याध्यक्ष मनान शेख, अहेमद पठाण, अवेज मुंजेवार, परवेज बौडीवाले, मुस्तसीन मुंजेवार, मझरोद्दीन बौडीवाले, हसन बौडीवाले, अतिक जमिनदार, ईनुस नरुने, इरफान मुर्शेद, अल्ताफ सय्यद, बाबुलाल पठाण यांच्यासह आदीने परीश्रम घेतले. देवणी शहरात टिपु सुलतान यांच्या जयंती निमित्त मिरवणूक काढण्यात आली होती यावेळी माजी प्राचार्य फकरोदीन बुदरे, एम आय एम चे देवणी तालुका अध्यक्ष फय्याज शेख, मेहमोदिन शेख, ताजोदिन बुदलेघर, बदनाळे इब्राहीन यांच्यासह असंख्य मुस्लिम बांधव उपस्याथित होते, यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# भिवंडी शहरातील पानपट्टी बंद, अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईच्या बडग्या नंतर खळबळ

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी शहरासोबतच नजीकच्या ठाणे मुंबई या परिसरात गुटखा विक्री केला जातो. विशेष म्हणजे विक्री साठी येणारा गुटखा गुजरात वरून भिवंडी मार्गे वितरित होत असतो. बऱ्याच वेळा गोदामांमध्ये साठवलेल्या कोट्यावधी रुपयांच्या गुटख्यावर कारवाई सुद्धा होते. परंतु त्यानंतर ही भिवंडी शहर व ग्रामीण भागात सर्रासपणे पानपट्टींवर गुटख्याची पाकीट टांगलेले आढळून येतात. त्यानंतर मागील काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासनाने आपला मोर्चा हा पानपट्टी धारकांकडे वळवल्यानंतर कारवाईचा बडगा सुरू केला आहे. मागील आठवड्यात भिवंडी शहर व ग्रामीण भागात सुमारे दहा पानपट्टी चालकांना ताब्यात घेत अटक केली व त्यानंतर त्यांची रवानगी आधारवाडी कारागृहात झाली आहे. याचा धसका शेकडो पानपट्टी चालकांनी घेतला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे पथक मागील काही दिवस शहरात कारवाई करीत असल्याने दिवसभर कारवाईच्या धासक्याने पानपट्टी बंद ठेवून कारवाई कुठे सुरू आहे याचा कानोसा घेऊन सायंकाळी पानपट्टी सुरू करीत आहेत. अन्न व औषध करीत असलेल्या कारवाई बाबत अनेक जण समाधान व्यक्त करीत असतानाच या छोट्या विक्रेत्यांना पकडण्या पेक्षा मोठे गुटखा विक्री करणारे व्यापारी यांच्या गळ्या भोवती फास आवळणे गरजेचे असून गुजरात येथून होणारी गुटखा वाहतूक रोखणे गरजेचे आहे अशी प्रतिक्रिया सर्वसामान्य नागरिकांनी दिली आहे.

# धनगर समाजाने दिले देवणी तहसीलदारमार्फत मुख्यमंत्र्याना विविध मागण्यासंदर्भात निवेदन!



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील धनगर समाजाच्या वतीने देवणीचे तहसीलदार गजानन शिंदे यांच्या मार्फत मुख्यमंत्र्याना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की धनगर समाजाचा एसटी आरक्षणाची तात्काळ अमलबजावणी करा. अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने धनगर आरक्षणाकरिता उच्च न्यायालयात दाखल याचिकेत अॅड.कुंभकोणी याची कायम नियुक्ती करणे तसेच न्यायालयात तात्काळ व दैनंदिन सुनावणी करिता अर्ज दाखल करणे, मेंडपाळासाठी घोषित केलेल्या दहा हजार कोटींच्या सहकारी महामंडळाचे जिल्हास्तरीय संस्था स्थापन झाल्या असून लवकरात लवकर सहकार महामंडळाची घोषणा करून योजना कार्यान्वित करण्यात यावी व तसेच स्वतंत्र अध्यक्षांची नेमणूक करणे, जे आदिवासींना तेच धनगरांना याप्रमाणे घोषित केलेल्या १००० कोटी रुपयांच्या २२ योजना पैकी काही योजना प्रभावीपने राबविल्या गेल्या नाहीत व संपूर्ण निधी सुद्धा उपलब्ध झाला नाही. त्याप्रमाणे आढावा घेऊन उपाययोजना करण्यात यावे. या सह अनेक मागण्या चे निवेदनात नमूद केले आहे. या निवेदनात माधव घोडके, कमलेश्वर घोडके, बालाजी हुनजे, हर्षवर्धन धनाडे, शाम धनाडे, प्रदीप तगरे, अजित सूर्यवंशी, आदित्य म्हेत्रे, भागवत अमृता बोडके, विश्वजीत म्हेत्रे, स्वप्निल म्हेत्रे, अंबादास कल्याणकर, ओम धनाडे, अमर म्हेत्रे, उमाकांत हुनजे, माधव कोरे, बालाजी मुराळे, काशिनाथ म्हेत्रे, रोशन पठाण, दत्ता चाळकापुरे, संजय बोरुळे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# वाड्यातील उच्च माध्यमिक शिक्षक कमलाकर नंदन यांचा पुरस्काराने सन्मान




**वाडा/प्रतिनिधी**

महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषद आयोजित, महाराष्ट्र राज्याच्या १३व्या राज्यस्तरीय शिक्षण परिषद व पुरस्कार सोहळा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथील नगरपालिका नाट्यगृह येथे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात वाडा तालुक्यातील एस.जी.देशमुख शिक्षण मंडळ खैरे-आंबिवली, जिल्हा पालघर संचलित माध्यमिक विद्या मंदिर व कनिष्ठ कला महाविद्यालय तुसे येथील शिक्षक कमलाकर भिला नंदन (उच्च माध्य शिक्षक) यांना माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत (अध्यक्ष राष्ट्रीय सैनिक यांच्या) यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी व्यंकटराव जाधव, प्रदेशाध्यक्ष महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक परिषद, मंगेश चिवटे, कक्ष प्रमुख मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मंत्रालय मुंबई. गजेंद्र कानडे, प्रदेश उपाध्यक्ष, अभय नंदन, संभाजीनगर जिल्हा सचिव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# पत्रकार दिपक साळुंखे यांना महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवक पुरस्कार जाहीर

**वाडा/प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना व सामाजिक संस्थांना प्रोत्साहन देणे व त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत व्यक्ती व संस्था यांना अनुक्रमे आदिवासी सेवक पुरस्कार व आदिवासी सेवा संस्था पुरस्कार हा राज्य पुरस्कार दरवर्षी प्रदान करुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येतो. आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त व्यक्तीस पंचवीस हजार एक रुपया रोख, तसेच आदिवासी सेवा संस्था पुरस्कार प्राप्त संस्थेस पन्नास हजार एक रुपया एवढी रक्कम पुरस्कार म्हणून देण्यात येते. मागील २०१९ पासूनचे पुरस्कार हे कोरोना परिस्थिती व काही अपरिहार्य कारणामुळे देण्यात आलेले नव्हते. राज्यस्तरीय निवड समितीची बैठक दि.७ नोव्हेंबर २०२३ रोजी पार पडली. सदर समितीने शिफारस केल्यानुसार राज्यस्तरीय निवड समितीचे सदस्य सचिव व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडून शासनास प्राप्त झाला. त्या मागील चार वर्षातील एकत्रित आदिवासी सेवक/आदिवासी सेवा संस्था पुरस्कार देण्याचे जाहीर केले आहे. वाडा तालुक्यातील कूसवडे (कोयना) येथील रहिवासी असलेले पत्रकार, सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ते दिपक पांडुरंगराव साळुंखे यांना, महाराष्ट्र शासनाचा, आदिवासी सेवक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्याचे सर्व स्वतरातून अभिनंदन होत आहे.अनेक वर्षे, गरजु लोकांची निस्वार्थपणे कामे केली, गोर-गरीब लोकांना न्याय मिळवून देण्याचे काम केले, उपोषणाच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला आहे. माहिती अधिकार क्षेत्रात मोठी किमया केली आहे. तीनशे पेक्षा अधिक अर्ज करण्याचा विक्रम केला आहे एक प्रामाणिक व्यक्तिला शासनाचा पुरस्कार मिळणे ही भूषणावह बाब आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**निविदा सूचना क्रमांक -११६ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामाच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील **सुशिक्षित बेरोजगार अभियंता** यांच्या कडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. २८/११/२०२३ ते दि. १२/१२/२०२३ सकाळी ११.०० ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ७ (सात) काम समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष (जी.एस.टी.) वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत धामणगांव येथे मेन रोड ते चिखलीपाडा खोरीपाडा रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ५,७७,३९२/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| २. | ग्रामपंचायत धामणगांव येथे वनेश कोंढारी ते दिनेश वरखंडे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ५,७३,८४८/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ३. | मौजे वरोर मोरेश्वर जगन्नाथ चौधरी रस्ता कि.मी. ०/०० ते ०/०७० ता. डहाणू, जि. पालघर | रु. ६,४४,१७६/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ४. | मौजे वरोर खाबली रस्ता नरेंद्र सुतारी ते नारायण पाटील यांची वाडी कि.मी. ०/०० ते ०/३०० ता. डहाणू, जि. पालघर | रु. ६,५०,९२९/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ५. | मौजे वरोर द्वारकानाथ मर्दे व बंदरवाडी रस्ता कि.मी. ०/०० ते ०/१०० डहाणू, जि. पालघर | रु. ६,५०,९२९/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ६. | मौजे तिघरपाडा मंदिराच्या पाठीमागे पाटीलआळी परशुराम काना पाटील ते गजानन काशिनाथ पाटील रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ६,५०,९२९/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |
| ७. | ग्रामपंचायत वासगाव पाटेपाडा येथील नारायण सुतार यांच्या घरापासून ते नवशा शिरोंदे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ता. डहाणू, जि. पालघर | रु. ६,५०,५०४/- | २५१५ ग्रामविकास व पंचायत राज विभाग |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २८/११/२०२३ ते दि. १२/१२/२०२३ पर्यंत

निविदा सादर करण्याचा - दि. १३/१२/२०२३ सकाळी ११.०० वा. ते संध्या. ५.४५ वा.पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. १८/१२/२०२३ दुपारी ११.०० नंतर शक्य झाल्या.

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/९५०६**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) ४०१ ४०४
दिनांक : २१/११/२०२३

सही/-
**(स.प्र. पाटील)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

**जिमाका/पालघर/जाहि १४०/५४०/२०२३ दिनांक : २४/११/२०२३**

27 NOV TO 03 DEC 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 11/25/2023 9:31 PM Page 1



# भावपुर्ण आदरांजली!

## अवघे जण पुष्पकमल चरणाशी वाहतील...
## स्मृती तुमच्या अनंतकाळ स्मरणात राहतील!



देवाज्ञा
१९ नोव्हेंबर
२०२३

# स्व.अनिल नारायण सांडभोर

## निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त

**महाराष्ट्रातील 'क्राईम संध्या'च्या प्रतिनिधींकडून भावपुर्ण आदरांजली!**



लक्ष्मणराव शंकरराव पाटोळे (संपादक - क्राईम संध्या)
गणेश चव्हाण (कार्यकारी संपादक)
सोनू जाधव (सहसंपादक, मुंबई)
किशोर साटम (पत्रकार, वसई)
रूपेश वाढे (पत्रकार, वसई)
किरण सोलंकी (पत्रकार, विरार)
अनंता पाटील (सल्लागार)
राम शंकरराव पाटोळे (सहसंपादक, लातूर)



ललितकुमार खरे (पत्रकार, जळगाव)
शकिल मणियार (पत्रकार, देवणी)
शिवाजी मोरे (पत्रकार, औसा)
रवि वाघमारे (पत्रकार, परभणी)
शिरीष शेरखाने (पत्रकार लातूर)
लक्ष्मण उजगरे (पत्रकार, परभणी)
शंकर सोनावणे (पत्रकार, लातूर)
हामिद शेख (छायाचित्रकार, लातूर)
सुरेश फरकांडे (पत्रकार, चाकुर)



संजय शिंदे (पत्रकार उस्मानाबाद)
अबेदखॉं बागवान (पत्रकार, सोलापुर)
अमर करकरे (पत्रकार, लातूर)
तैसिफ सैय्यद (पत्रकार, ता. अहमदपुर)
वसंत कांबळे (पत्रकार, ता. औसा)
फिरोज शेख (पत्रकार, अहमदपूर)
रवि शेट्टी (पत्रकार, नालासोपारा)
इरप्पा बोरीकरजगी (पत्रकार, सोलापुर, जिल्हा)
संजय लांडगे (पत्रकार, वाडा)



शिरीष वानखेडे (पत्रकार, कल्याण)
राजाराम ओव्हाळ (पत्रकार, विरार)
किरण तेलगोटे (पत्रकार, उल्हासनगर)
रवि शिंदे (पत्रकार, भिवंडी)
प्रेमशंकर गुप्ता (पत्रकार, विरार)
सुनिल तांबे (पत्रकार बदलापूर)
अभिजित निंबाजी हिरे (पत्रकार, भिवंडी ग्रामीण)
मोहन कुंभार (पत्रकार, कोल्हापुर)
परमेश्वर गडदे (पत्रकार, मुंबई)